रविवार
०८
नोव्हेंबर २०२६
यवतमाळ

पृष्ठे ४+12
अंक १७८
वर्ष ५
किंमत ४

दैनिक
लोकसूत्र
आवाज जनसामान्यांच्या हक्काचा



समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा

समतेची सहस्रकिरणे उजळावी!



केशव सवळकर
कार्यकारी संपादक, दै. लोकसूत्र
9623207355

सूर्ये आधिष्ठीली प्राची।
जगा जाणीव दे प्रकाशाची॥
तैसी श्रोतया ज्ञानाची।
दिवाळी करी॥

दीपावलीचा हा पवित्र सण म्हणजे केवळ रोषणाईचा झगमगाट, नवीन वस्त्रांची खरेदी किंवा फटाक्यांची आतषबाजी नव्हे. जेव्हा आपण या पर्वाच्या बाह्यांगापासून त्याच्या अंतरंगात डोकावतो, तेव्हा संत-महात्म्यांच्या वाणीतून, निसर्गाच्या चक्रावरून आणि प्राचीन ग्रंथांच्या साक्षीवरून या सणाचा अर्थ अफाट मानवी उंची गाठणारा ठरतो. दीपावली ही मानवी जीवन, आरोग्य, अर्थकारण आणि कृषी संस्कृतीला एका सूत्रात बांधणारी जगातील सर्वात मोठी जीवनशैली आहे.

माऊली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...
मी अविवेकाची काजळी।
फेडोनि विवेकदीप उजळी।
ते योगिया पाहे दिवाळी। निरंतर

मुळात मानवाच्या मनपटलावर अविवेकाची काजळी पसरली आहे. ती काजळी दूर झाल्याशिवाय मानवी अंत:करणात विवेकाचा दीप उजळू शकत नाही. एकंदरीत दिवाळी हा विवेकाचा दीप प्रत्येक माणसात उजळविणारा उत्सव ठरावा, ही अपेक्षा आहे. या सणामागे केवळ परंपरा नव्हे तर एक विज्ञानसुद्धा आहे. पावसाळा संपून जेव्हा हिवाळ्याची चाहूल लागते, तेव्हा निसर्गात एक मोठा बदल होतो. पावसाळ्यातील ओलसरपणामुळे हवेत आणि मातीत जंतू, डास व कीटकांचा प्रादुर्भाव वाढतो. अशा संक्रांतीच्या काळात आपल्या पूर्वजांनी आरोग्याची उत्तम काळजी घेण्यासाठी एक नैसर्गिक पेस्ट कंट्रोल रचला. घराघरांमध्ये लावले जाणारे कडुलिंब व करंजाच्या तेलाचे दिवे आणि विशिष्ट वनस्पतींचा धूप हवेतील हानिकारक जंतू नष्ट करण्याचे काम करायचा. हा केवळ धार्मिक विधी नसून, रोगराईपासून मानवी शरीराचे रक्षण करणारा आरोग्यविज्ञानाचा एक प्रभावी उपाय होता.याच मालिकेत नरक चतुर्दशीच्या पहाटे उटणे आणि सुवासिक तेल लावून अभ्यंगस्नान करण्याची आपली परंपरा आहे. हिवाळा सुरू होताच त्वचा कोरडी पडू लागते; अशा वेळी उटण्यातील आयुर्वेदिक औषधी वनस्पती व तेल त्वचेला आवश्यक ती आर्द्रता देतात, रक्ताभिसरण वाढवतात आणि हिवाळ्याच्या कडक थंडीसाठी शरीराला पूर्वतयारी करून देतात. याच काळात शरीराला अधिक उर्जेची (कॅलरीज) गरज असते; म्हणूनच डिंकाचे लाडू, अनारसे, चकली आणि सुका मेवा यांसारख्या सकस फराळाची निर्मिती केली गेली, जो शरीराला ताकद देण्याचे काम करतो.

खगोलशास्त्रानुसार दिवाळी नेहमी अश्विन अमावास्येला येते, ज्या काळात सूर्य तूळ राशीत प्रवेश करतो. हा काळ वर्षातील सर्वात गडद आणि मोठ्या रात्रींपैकी एक मानला जातो. या घनदाट अंधाराला आणि एकाकीपणाला छेदण्यासाठी दिव्यांची रांग (दीपावली) लावण्याची पद्धत सुरू झाली. पावसाळ्यानंतरच्या ढगाळ वातावरणामुळे मानवी शरीरात मेलाटोनिन संप्रेरक वाढून सुस्ती किंवा औदासिन्य येऊ शकते. अशा वेळी घराभोवती शेकडो दिवे लावल्याने मेंदूमध्ये सेरोटोनिन (आनंद देणारे संप्रेरक) पाझरते, ज्यामुळे आळस दूर होऊन मानसिक उत्साह संचारतो. मनातील अंधार आणि नैराश्य संपवून प्रकाशाकडे जाण्याची ही मानवी मनाची आंतरिक ओढ असते.

उर्वरित पान नं. ६ वर



काय आहेत दिवाळीचे प्राचीन संदर्भ?

या सणाची मुळे आपल्या प्राचीन संस्कृतीत खोलवर रुजलेली आहेत. प्रभू रामचंद्र चौदा वर्षांचा वनवास संपवून अयोध्येत परतले, तेव्हा प्रजेने दिवे लावून त्यांचे स्वागत केले होते. उपनिषदांमधील तमसो मा ज्योतिर्गमय (अंधाराकडून प्रकाशाकडे जाणे) हा विचार दीपावलीचा मूळ आत्मा बनला. वात्स्यायनाच्या प्राचीन कामसूत्र ग्रंथात याला यक्षरात्री म्हटले आहे, तर सम्राट हर्षवर्धनाच्या नागानंद नाटकात हिला दीपप्रतिपदुत्सव म्हणून संबोधले गेले आहे. राजशेखर यांच्या काव्यमीमांसा ग्रंथात घरे स्वच्छ करून ती दिव्यांनी सजवण्याच्या आणि रात्री लक्ष्मीपूजन करण्याच्या पद्धतीचे स्पष्ट वर्णन मिळते.केवळ भारतीय ग्रंथच नव्हे, तर मध्य आशियाई इतिहासकार अल-बिरुनी (ई.स. 1030) आणि विजयनगर साम्राज्याला भेट देणारे इटालियन प्रवासी निकोलो दे कॉंटी (ई.स. 1420) यांनी आपल्या नोंदींमध्ये कार्तिक अमावास्येला हजारो दिवे एकाच वेळी प्रज्वलित करून साजरा होणाऱ्या या दिमाखदार महोत्सवाचे विस्मयकारक वर्णन केले आहे.

कृषी संस्कृती, बलीराजा आणि धान्याची समृद्धी

ऐतिहासिक आणि वैज्ञानिक धाग्यांच्याही पलीकडे जाऊन विचार केला, तर दिवाळी हा मुळात नवान्न उत्सव (शेतकऱ्यांचा सण) आहे. खरीप पिकांची (भात, ज्वारी, बाजरी) कापणी याच काळात होते. कष्टाने पिकवलेले सोन्यासारखे पीक जेव्हा शेतकऱ्याच्या घरी येते, तेव्हा तो राजा बळीचे आणि जमिनीच्या सुपीकतेचे आभार मानतो. म्हणूनच लक्ष्मीपूजनाला नवीन धान्याच्या लाह्या आणि बत्ताश्यांचा नैवेद्य दाखवला जातो. महाराष्ट्रात दिवाळी पाडव्याच्या दिवशी दारासमोर रांगोळीत बळीराजाची पूजा करून "इडापीडा टळो, बळीचे राज्य येवो!" अशी प्रार्थना केली जाते. केरळमध्ये ओणम हा कृषी उत्सव राजा बळीच्या स्वागतासाठीच साजरा होतो, तर पंजाबमध्ये बैसाखी, तामिळनाडूमध्ये पोंगल आणि आसाममध्ये बिहू यासारखे सण याच कृषी चक्राशी आणि निसर्गाशी जोडलेले आहेत.

दिवाळीच्या या पर्वात धनत्रयोदशीला धन्वंतरी जयंती साजरी केली जाते. भगवान धन्वंतरी हे अमृत कलश हातात घेऊन समुद्रातून बाहेर आले, जे आरोग्याचे आणि आयुर्वेदशास्त्राचे प्रतीक मानले जातात. "पहिलं सुख ते निरोगी नरदेह" या न्यायाने, संपत्ती मिळवण्यापूर्वी शरीराचे आरोग्य सांभाळणे हा माणसाचा पहिला धर्म आहे, याची आठवण हा दिवस करून देतो. या दिवशी तांब्या-पितळेची भांडी खरेदी करण्याची परंपरा आहे, कारण आयुर्वेदानुसार तांब्याच्या भांड्यातील पाणी पचनास व आरोग्यास उत्तम असते. तसेच धने आणि गुळाचा प्रसाद ऋतू बदलामुळे होणाऱ्या त्रासांपासून रक्षण करतो. याच धनत्रयोदशीला कुबेर पूजन आणि पुढे लक्ष्मीपूजन केले जाते. येथे संपत्ती म्हणजे केवळ सोने-नाणे किंवा कागदी नोटा नव्हेत, तर घरात आलेले नवीन धान्य, सुजलाम सुफलाम झालेली शेती, गोधन आणि निरोगी शरीर हीच खरी धनसंपदा आहे. आरोग्याची धन्वंतरी आणि समृद्धीचा कुबेर जेव्हा एकत्र येतात, तेव्हा मानवी जीवन पूर्णत्वाकडे जाते. याच संदर्भात यमदीपदानाची प्रथा सांगते की, पावसाळ्यानंतरच्या साथीच्या आजारांपासून रक्षण करत आरोग्याची निगा राखणे म्हणजेच यमाचे भय दूर करणे होय.







तेजोमय दिव्यांची सुंदर प्रभा उजळली,
आनंदाची नवी पहाट आयुष्यात सजली.
तुम्हाला व तुमच्या परिवारास दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!





अँड.प्रियदर्शनी
बिना अशोक उईके
नगराध्यक्ष नगर परिषद, यवतमाळ



कु. तेजस्विनी बिना
अशोक उईके



सौ. बिना
अशोक उईके

क्रांतीवीर
भगवान
बिरसा मुंडा
जनजाती गौरव दिन
सेवा सप्ताह
२०२६
११ नोव्हेंबर ते
१८ नोव्हेंबर

प्रा. डॉ. अशोक उईके
मंत्री आदिवासी विकास विभाग महा.
राज्य तथा पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा

वसुबारस: पशुधन जतनाचा संस्कार



शशिकांत तोटे
दारव्हा, मो. ९१३०८३५४५८

'दिन दिन दिवाळी,गाई म्हशी ओवाळी' हा केवळ वाक्यप्रचार नव्हे तर भारतीय संस्कृती होय. आपल्या भारतीय संस्कृतीतील सण-उत्सवांना केवळ धार्मिक परंपरेचे स्वरूप म्हणून बघणे योग्य नसून,त्यामागे मानवी जीवनमूल्यांची, निसर्गाशी नात्यांची आणि कृतज्ञतेची मोठी शिकवण दडलेली आहे.आज दिवाळीचा पहिला दिवस अर्थात वसुबारस. हा सण म्हणजे केवळ गायीची पूजा करण्याचा दिवस नाही,तर शेतीसंस्कृतीचा कणा असलेल्या पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय ग्रामीण जीवनात गाय, बैल आणि इतर पाळीव जनावरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे.पूर्वी शेतीची संपूर्ण व्यवस्था पशुधनाभोवती फिरत होती. बैलांच्या मदतीने शेताची नांगरणी, पेरणी,मळणी आणि मालाची वाहतूक केली जात असे. गायीपासून मिळणारे दूध, दही,तूप यांचा उपयोग केवळ आहारासाठीच नव्हे,तर ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही आधार देण्यासाठी होत असे.शेणखतामुळे जमिनीचा कस टिकून राहत होता.त्यामुळे पशुधन हे अमृता समान होते. पशुधनाच्या ऋणाची जाणीव करून देणारा सण भारतीय संस्कृतीत



सण-उत्सवांना केवळ धार्मिक परंपरेचे स्वरूप नाही,तर त्यामागे जीवनमूल्यांची, निसर्गाशी नात्याची आणि कृतज्ञतेची मोठी शिकवण दडलेली आहे.दिवाळीचा प्रारंभ वसुबारस या सणाने होतो. हा सण म्हणजे केवळ गायीची पूजा करण्याचा दिवस नाही,तर शेतीसंस्कृतीचा कणा असलेल्या पशुधनाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा आणि त्याच्या संवर्धनाची जबाबदारी स्वीकारण्याचा दिवस आहे.

भारतीय ग्रामीण जीवनात गाय, बैल आणि इतर पाळीव जनावरांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आज काळ बदलला. शेतीमध्ये यांत्रिकीकरण आले. ट्रॅक्टर, आधुनिक अवजारे आणि रासायनिक खतांच्या वापरामुळे पारंपारिक पशुधनाचे महत्त्व काही प्रमाणात कमी झाले. मात्र, त्याचे महत्त्व संपलेले नाही. आज दुग्ध व्यवसाय हा लाखो ग्रामीण कुटुंबाच्या अर्थजनाचा महत्त्वाचा आधार आहे.शेतीपूरक व्यवसाय म्हणून पशुपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देत आहे. परंतु, दुर्दैवाने आज पशुधनासमोर अनेक संकटे उभी आहेत.दुष्काळी परिस्थितीमुळे चाऱ्यांची टंचाई, पाण्याचे दुर्भिक्ष, वाढता पशुखाद्याचा खर्च,जनावराचे आजार आणि पशुवैद्यकीय सुविधांच्या अभावामुळे पशुपालन अडचणीत आहे. अनेकदा आर्थिक अडचणीमुळे जनावरांची योग्य काळजी घेणे शक्य होत नाही. भाकड जनावरांकडे दुर्लक्ष करणे, त्यांना मोकाट सोडणे आणि गोवंशांच्या संगोपनाकडे पाठ फिरवणे देखील चिंतेची बाब आहे. आजची वसुबारस साजरी करत असताना या वास्तव्याकडे डोळेझाक करून चालणार नाही. केवळ गाईची आरती किंवा तिचे पूजन करून पशुधनाविषयी कर्तव्य पूर्ण होत नाही.जनावरांना पुरेसा चारा, स्वच्छ पाणी, निवारा,वेळोवेळी उपचार आणि कायदेशीर सुरक्षितता उपलब्ध करून देणे ही वसुबारस्याची खरी पूजा आहे. त्यात शासनाने ही आर्थिक मदतीवर भर देणे जरुरी आहे.वसुबारस हा सण माणसाला उपकरांची जाणीव करून देतो.आपल्या जगण्याला समृद्ध करणाऱ्या पशुधनाला विसरता कामा नये.पशुधनाचे संवर्धन म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे संवर्धन,म्हणजे शेतीसंस्कृतीचे संरक्षण होय. आजच्या दिवाळीच्या पहिल्या दिवशी उजळणारी पणती केवळ घरात प्रकाश न आणता पशुधनाच्या जीवनातही सुरक्षितता, संवेदना आणि सन्मानाचा प्रकाश निर्माण करणारी ठरावी. हीच वसुबारसेची खरी शिकवण होय.



बिशी ब्याळी अन्ना

दिवाळीत फराळाचे विविध पदार्थ खाऊन सारेच कंटाळले आहेत आणि बायकाही सर्व कामे , फराळाचे बनवुन दमल्या आहेत. आता जेवणात पण साग्रसंगीत भाजी ,पोळी ,आमटी,भात, कोशिंबीर वगैरे सर्व करण्याचा खूप कंटाळा येतो. अशा वेळी 'वन डिश मिल' केली तर खाणाराही खुश आणि करणारा त्याहून खुश! ही करायला सोपी, हलकी, खूपच टेस्टी आणि आरोग्यासाठी उत्तम अशी डिश आहे . हा कर्नाटक मधील खास पदार्थ असून बिशी म्हणजे गरम ,ब्याळी म्हणजे डाळ ,आणि अन्ना म्हणजे भात . भाज्या ,डाळी घालून बनवलेला सांबार आणि भात. चला, मग पाहूया.

साहित्य : 1 वाटी तांदूळ , पाव वाटी तुरीची डाळ ,पाव वाटी मुगाची डाळ ,1 चमचा उडीद डाळ , पाव वाटी हरभऱ्याची डाळ , 1 कांदा ,2 सिमला मिरच्या ,1 टोमॅटो , या शिवाय शेवग्याची शेंग , वांगी ,गोवार ,फ्लॉवर , मटार , कॉर्न यापैकी कोणत्याही आवडीनुसार भाज्या , कोथिंबीर , कढीपत्ता , 1 चमचा लाल तिखट , 1 चमचा सांबार मसाला , 2 चमचे चिंचेचा कोळ , अर्धी वाटी नारळाचा चव , पाव चमचा मेथ्या ,मोहरी, जिरे ,पाव चमचा हिंग पावडर, हळद, मिठ, तेल वरून घालण्यासाठी तूप .



कृती : प्रथम तांदूळ ,तूरडाल ,हरभरा डाळ व मूग डाळ स्वच्छ धुवून दुप्पट पाणी घालून कुकरला मोठ्या गॅसवर 2 शिट्ट्या काढून लगेच बाहेर काढावे. म्हणजे जास्त शिजणार नाही.

मग सर्व भाज्या धुवून चिरून घ्याव्यात . मग कढई मध्ये 2 चमचे तेलाची फोडणी करून त्यात मोहरी, जिरे, मेथ्या, हिंग, कढीपत्ता घालून मस्त फोडणी करून त्यात कांदा ,टोमॅटो ,सिमला मिरची, घालून सर्व भाज्या घालून थोड्या शिजवून घ्याव्यात .नंतर त्यात तिखट ,सांबर मसाला घालून शिजवलेल्या डाळी व भात घालून नारळ ,चिंच गूळ , मीठ ,कोथिंबीर घालून पुन्हा व्यवस्थित शिजवून घ्यावे .

व्यवस्थित शिजला की छोट्या कढई मध्ये 2 चमचे तेल घालून पुन्हा थोडे मोहरी, जिरे, उडीदडाळ ,हिंग ,हळद घालून खमंग फोडणी घालावी. वरून फोडणी घातल्यामुळे रंग तर छान येतोच पण उडीद डाळ सुद्धा खमंग मस्त लागते . गरम गरम डिश मध्ये काढुन वरती साजूक तूप घालून सर्व्ह करावे.

वैशिष्ट्य : भाज्या ,डाळी यामुळे पौष्टिक आणि भातामुळे पचायला हलका असा हा भाताचा प्रकार आहे. स्वादिष्ट, व सर्वांना आवडणारच अशी ही दिश नक्कीं करून पहा. हा थोडासा सैलसरच जास्त छान लागतो. चिंच गुळाची आंबट गोड चव, मेथ्या, हिंग, कढिपत्ता यांची किंचित कडवट, तुरट चव, डाळी, सर्व भाज्यांचा एकत्र स्वाद, कोकणातील खास सुगंधी तांदूळ आणि नारळाचा स्वाद आणि वरुन साजुक तुपाची धार ...यामुळे कोकणात तर ही डिश नक्कीच आणखी लाजवाब लागणार यात शंकाच नाही.

- सौ .स्नेहा मुसरीफ ,पुणे .

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

सुरक्षित मातृत्व आश्वासन - सुमन

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

उद्देश :
सर्व प्रतिबंधात्मक माता आणि नवजात मृत्यू टाळणे.

लाभार्थी : शासकीय आरोग्य संस्थेत येणाऱ्या सर्व गर्भवती महिला/ प्रसुती पश्चात 6 महिन्यापर्यंतच्या माता/ नवजात बालके

कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणाऱ्या मोफत गुणात्मक सेवा :
- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (JSSK)
- जननी सुरक्षा योजना (JSY)
- लक्ष (LaQshya)
- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान (PMSMA)
- मातेचे परिपूर्ण प्रेम (MAA)
- आजारी नवजात बालकांची काळजी (SNCU)
- लसीकरण (RI)
- माता व नवजात बालकांची घरी घ्यावयाची काळजी (HBNC)

सेवा मिळण्यात काही अडचण आल्यास 104 या टोल फ्री क्रमांकावर अथवा https://suman.nhp.gov.in या पोर्टल पोर्टल वर संपर्क साधावा

हसरा चेहेरा अन आनंदाचे वातावरण,
दिवाळीच्या सोनेरी क्षणांचे हे संकलन.
घरोघरी उजळो दिव्यांची हीच परंपरा,
शुभ दिवाळीचा सण जावो सर्वांत न्यारा!

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!

श्री. राजिव शिंदे
गटविकास अधिकारी,
पंचायत समिती नेर
तथा समस्त कर्मचारी वृंद, नेर पंचायत समिती

|| जय सेवा ||
क्रांतीवीर भगवान
|| जय बिरसा ||
बिरसा मुंडा
जनजाती गौरव दिन
सेवा सप्ताह
2026
११ नोव्हेंबर ते १८ नोव्हेंबर

अॅड.प्रियदर्शनी बिना अशोक उईके
नगराध्यक्षा
नगर परिषद, यवतमाळ

कु.तेजस्विनी बिना अशोक उईके

सौ.बिना अशोक उईके

प्रा.डॉ. अशोक उईके
मंत्री, आदिवासी विकास विभाग महा.राज्य तथा पालकमंत्री चंद्रपुर जिल्हा

भारतीय जनता पार्टी यवतमाळ

शोन्याचे फिटनेस संकल्प

दरवर्षी ३१ डिसेंबरला आमचा सोन्या खूप जोशात संकल्प करतो सकाळी लवकर उठून फिरायला जाण्याचा. पाहिले तीन चार दिवस उत्साहात तो पार सुद्धा पाडतो त्यासाठी केवढी तरी तयारीही करत असतो. अगदी जॉगिंगचे बुट, कपडे आणण्यापासून ते नॅपकिन, पाण्याची बाटली, फिरून येताना डाएटसाठी ज्यूस गाजराचा, बिटाचा की आणखी कोणता प्यायचा हे ठरवायचे..कित्तीतरी ठरवतो, जाहीर करतो ,नव्या संकल्पाचे नऊ दिवस सुद्धा कधीच पूर्ण होत नाहीत पण बिचाऱ्याचे. नेमके तीन,चार दिवस होतात तोच त्याची तब्येत बिघडते,पोटात दुखते किंवा मग रात्री झोपच लागलेली नसते,डोके दुखते.. खूप काहीतरी त्रास व्हायला सुरुवात होते,आणि मग हे काही आपले काम नाही, आपण फिटनेस साठी दुसराच कोणता तरी उपाय शोधू असे ठरते आणि बोऱ्या वाजतो त्या पहिल्या वाहिल्या संकल्पाचा! मग त्या ऐवजी काहीतरी करून पाहू असे ठरते. शोधाशोध केल्यावर जवळच एक मस्त जिम.. फिटनेस सेंटर दिसते. इंटरनेट वरून सर्च करून रिव्ह्यूज् पाहतो, वा! गोल्ड जिम आहे , फी जास्त असणारच, पण रिझल्ट्स पण तसेंच असतात ना? दाम तसे काम! मस्त ट्रेनर्स, भारी साहित्य असते सगळे, आपल्याला लवकर वेटलोस करायचाय ना? मग हेच करूया असे पक्के ठरते. तिथे जाऊन प्रत्यक्ष पाहून चौकशी केल्यावर फि चा आकडा ऐकून एकदा अंतर्मनातून आवाज येतोही,हे नक्की जमेल ना? पण निर्धार इतका पक्का केलेला असतो,की यां खेपेस काहीही झाले तरी सगळ्यांना बारीक होऊन दाखवायचेच. त्यातून सहा सहा महिन्याची फी भरायची सवलत आहे ,मग काय झटक्यात भरून टाकली सहा महिन्याची फी! मग त्यासाठी पुन्हा खास शूज,सॉक्स,ड्रेस ... सारी जय्यत तयारी होऊन नव्या कोऱ्या सॅक मध्ये पाण्याच्या बाटली, नॅपकिन पासून ते जिमच्या कार्डा पर्यंत सगळे भरले जाते. आणि मोठ्या दिमाखात देवाला नमस्कार करून बजरंगबळीचे नावं घेऊन जिमला निघते गाडीवर बसून स्वारी! पहिल्याच दिवशी कधीच काहीही व्यायाम नं केलेल्या त्या शरीरावर अत्याचार होण्यास सुरुवात होते तिच मुळी 10 मिनिटे वॉर्म-अप करणे.. स्ट्रेचिंग करणे यांनी. मग २५-३० मिनिटे सोपे मशीन व्यायाम करुन घेतले ट्रेनरनी आणि शेवटी पुन्हा स्ट्रेचिंग करून घेतले आणि संपले. एवढे पैसे घातलेत तर एवढा व्यायाम तरी हवाच ना? जमतेय.. आनंदात दिवस कसा मस्त पार पडला. रात्री खूप बारीक आणि 6 पॅक वगैरेंची स्वप्न सुद्धा दिसली. खूप आनंद झाला. दुसरा दिवस कधी उजाडतो असे झाले. पुन्हा उत्साहात जिमला गेल्यावर मात्र आधी कालच्यासारखे स्ट्रेचिंग करून घेतले ब्रेक मध्ये मग तिथल्या उपकरणांची ओळख करून द्यायला सुरु केले. अगदी स्किपींग रोप पासून ते मोठ्ठा व्यायामाचा बॉल, वजनाचे डंबेल्स,बार्बेल, केट्लबेल्स, बेंचप्रेस, लेगप्रेस मशीन, पुलाआऊट् मशीन, क्रॉस ओवर मशीन, बायसेप कर्ल मशीन याशिवाय नेहमीची कार्डीओची ट्रेडमील, बाईक, रोईंग मशीन, स्टेअर मास्टर वगैरे असंख्य उपकरणे पाहूनच आता हे इतके करायला लावणार का हा ट्रेनर? म्हणून पोटात गोळाच आला. तरीही याखेपेस तीन चार दिवस केल्यानंतर त्यांनीच कंपल्सरी सुट्टी घ्यायची असते ,उद्या नको म्हणाले तशी जीव भांड्यात पडला. मग एक म्हणताना तीन चार दिवस सुट्टी झाली. अंग दु:खायला लागले होते. तरीही पाहिले पंधरा दिवस सवय होण्यासाठी हलका,सोपा व्यायाम करून घेतल्यामुळे थोडा होतोय त्रास,पण जमेल हळूहळू, जमवावेच लागेल असे म्हणत काढले. त्यांनतर मात्र ट्रेनरनी मशिन्सवर व्यायाम करवून घेऊन ताणण्यास सुरुवात केली. मग मात्र नको ते जिम, नको ते बारीक होणे,कुठून सुचले.. वगैरे वगैरे सुरु झाले, मग तिथे असलेल्या योगा चटई कडे लक्ष गेले आणि पुढच्या काही दिवसातच या जिम अध्यायाची समाप्ती झाली. आता आम्हाला वेध लागले होते योगासनाने मस्त बारीक होण्याचे! पुन्हा याच्या चौकशा,शोधमोहीम सुरु झाली आणि योगायोगाने आमच्या सोसायटीतच एक खूप छान योगासन क्लास असल्याचे लक्षात आले. मग काय? पुन्हा नव्या दमाने लागला तयारीला. आता मात्र अजिबात योगा करणे सोडायचे नाही. जिम पेक्षा सोपेच असेल नक्की. असा पुन्हा एकवार निर्धार केला. योगा मॅट आणली सुंदर नवकोरी शोधून!आता काय,बूट वगैरे लागणार नव्हतेच,त्यामुळे तर काय खर्च सुद्धा कमी होता,आणि मग रामदेव बाबांपासुन ते कित्येकांचे व्हीडीओ पाहून झाले,काही सीडी विकतसुद्धा आणल्या. आणि श्री गणेशा झाला एकदाचा! इथेही पुन्हा जिमचीच पुनरावृत्ती झाली. ते पैसे भरपूर घातल्यामुळे किमान जेमतेम महिनाभर तरी झाले,पण हे तर काय, उगाच वेळ वाया घालवून हात पाय विकत दुखवून घेणे आहे हे लक्षात आले आणि अवघ्या पंधराच दिवसात खेळ संपला. आता? वजन तर वाढतच आहे,काहीतरी केलेच पाहिजे ,पण कष्ट जमणे नाही बारीक होण्यासाठी योग्य हे समजले आणि मग डाएट करुन नक्की जमेल हे सुचले. हे आधीच कसे सुचले नाही, याचे आश्चर्य पण वाटले. मग काय, बऱ्याच जाहिराती पाहिल्या, डाएटचे ज्यूसेस पिऊन पाहिले ,पण फक्त तेवढे पिऊन राहणे म्हणजे खूप मोठे पापच आहे,इतके छान छान पदार्थ अस्तित्वात असताना ! त्यातुन आज तरी घरात पुरणाची पोळी, भजी ,बटाट्याची भाजी ... असा सुन्दर मेन्यु असताना तरी नाहीच. पुन्हा उद्याही खास मित्राची बर्थडे पार्टी आहे,त्यालाही मी नाही खाणार, म्हटल्यावर कित्ती वाईट वाटेल ? हे तीव्रतेने जाणवले आणि त्याचा तो पण बेत बारगळला. त्यानंतर स्विमिंगची टुम निघाली. नेहमीप्रमाणेच अगदी भारी स्विमिंग सुट पासून ते गॉगल पर्यंत सगळी तयारी झाली आठवडाभर मस्त झालेही त्याचे पोहणे! पण स्किन काळी पडली, आणि मुख्य म्हणजे सर्दी झाली खूप,त्यामुळे बिचाऱ्याला ते सुद्धा थांबवावे लागले. काय करणार ना? शेवटी मात्र आता बेस्ट डाईटिशियनचा सल्ला घेऊनच डाएट फॉलो करायचे नक्की केले. शहरातील सगळ्यात बेस्ट डाईटिशियनची अपॉइंटमेंट घेतली, वेळ काढून गेला. एकदम सोप्पे, भरपूर, छान नवीन नवीन पदार्थ खाण्याचे मस्त डाएट लिहुन दिले होते. ते पाहुन तर शोन्या अगदिच खूश झाला.हे कित्ती सोप्पे आणि छान आहे, आधीच का नाही सुचले, याचा पश्चात्ताप झाला अगदीच.

महिनाभर व्यवस्थित डाएटिंग केले. पण दररोज तेच सालेद, तेच फळ, वगैरे खाण्याचाही खूप कंटाळा आला. चायनीज,पिझ्झा,बर्गर सगळे जंकफुड् खुणावू लागले होते. मित्र सुद्धा नेमके याच्या डाईटच्याच वेळी कशा पार्ट्या काढतात? मित्र कसले,पक्के वैरीच भासत होते आता सगळे शोन्याला. ते काही नाही. आता पुन्हा भेटायला जायचेच आहे तेंव्हा उद्याच त्यांना डाईट थोडे चेंज करून द्यायला सांगू म्हणत चक्क त्यांच्याकडे गेलाही. त्यांनीही थोडेसे वजन कमी झाले आहे,नक्की कमी होईल, प्रयत्न सोडू नकोस, म्हणत थोडेसे बदलून दिले डाईट.महिन्यातून एक दिवस चिट दिवस ठेवायला सांगितला. त्या दिवशी जे आवडेल ते खा म्हणून सांगितले. मग खुश झाली स्वारी! घरी जाताना काही कामे होती,ती करूनच जाऊ असे ठरवले. झटपट कामे केली. आता भूक पण लागली होती, समोरच नेमके वडापावचे दुकान दिसले. तिथून खमंग वड्यांचा नुसता घमघमाट सुटला होता. आता मात्र धीर सुटला. मॅडमचे शब्द आठवले, तो महिन्यातील चिट दिवस आजच करूया असा विचार केला आणि त्या शॉप मध्ये थेट घुसली स्वारी. ऑर्डर दिली आणि बाजूच्या टेबलवरून ओळखीचा आवाज आला म्हणून पाहिले तर काय? चक्क आतांच त्याला डाईट लिहून देणाऱ्या मॅडम मस्त गरम गरम वड्यावर ताव मारत बसल्या होत्या! दोघांनीही एकदम एकमेकांकडे पाहिले आणि दोघांनीही नजर चुकवली. काय करावे सुचेना. विचित्र कोंडी झाली. ओळख देणे टाळले, नजर चोरली तेवढ्यात पार्सल तयार झाले आणि ते घेऊन हा हळूच तिथून सटकला. मॅडमनाही हुश्श झाले असावे. नंतर त्याच्या डोक्यात विचार आला, या मॅडम तर 'लोकांसांगे ब्रह्मज्ञान..' अशाच दिसत आहेत. उगाच त्यांच्या त्या डाईटच्या फंदात पडलो. जाऊदे! अन्नदेवता प्रसन्न आहे तर मस्त खाऊन पिऊन ऐश करून घेऊ म्हणत या संकल्पाचा सुद्धा धुव्वा उडाला. आता तो नवीन काहीतरी उपाय शोधत आहे. पाहूया काय सापडतो ते!तुम्हालाही अजून काही नवीन सुचले तर नक्की त्याला सुचवा बरकां !

- सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे.

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!
शुभेच्छुक...
आर जे. सरागे
अध्यक्ष व्होकेशन ट्रेनिंग सेंटर पुसद
राज्य शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त
निवृत्त सेवा निदेशक : शासकीय आय.टी. आय. गुंज ता. महागांव
माजी संस्थापक सचिव, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण शासकीय कर्मचारी सहकारी पतसंस्था म. पुसद जि. यवतमाळ

जागतिक आयोडीन न्यूनता विकार प्रतिबंध दिन
२१ ऑक्टोबर २०२५
रोजच्या आहारात
आयोडिनयुक्त मिठाचाच वापर करा
आयोडीनयुक्त मीठ
आयोडीनच्या अभावामुळे होणारे आजार
• गलगंड • अपंगत्व व मतिमंदता
• मुकबधिरता • जन्मतः व्यंगत्व
भावी पिढी तसेच गरोदर मातेने शारीरिक व मानसिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी आयोडीनयुक्त मिठाचा वापर करावा
शक्ती आणि बुद्धीचा रक्षक आयोडिनयुक्त मीठ
वरील प्रमाणे लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या अधिक माहितीकरिता आशा/अंगणवाडी सेविका/ आरोग्य कर्मचारी यांच्याशी संपर्क साधावा.
जनजागृती पंधरवडा (दि. १४ ते २८ ऑक्टोबर २०२५)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.यवतमाळ

समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!
एक शुभेच्छुक
पुसद

ह्सरा चेहेरा अन आनंदाचे वातावरण,
दिवाळीच्या सोनेरी क्षणांचे हे संकलन.
घरोघरी उजळो दिव्यांची हीच परंपरा,
शुभ दिवाळीचा सण जावो सर्वांत न्यारा!
समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!
नीरज डफळे
मुख्याध्यापक, वेदधारणी प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव, यवतमाळ

बालाजी अर्बन
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
जुनी गुजरी चौक, दिग्रस, जि. यवतमाळ
नोंदणी क्र. Y.M.L./D.R.S./R.S.R./C.R./606/2003
आपला विश्वास आमची प्रगती
दिग्रस जि. यवतमाळ
संस्थेची रौप्य महोत्सव कडे वाटचाल
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा
श्री राहुल वि. शिंदे
अध्यक्ष
मो. 9422165425
श्री अश्विन ना. चौधरी
उपाध्यक्ष
मो. 9423135034

चटपटीत क्रीस्पी फुले

बऱ्याच मुलांना खाण्याचे अजिबात वेड नसते. खाण्यासाठी सतत मागे लागावे लागते त्यांच्या. अशावेळी जर त्यांचे लक्ष वेधून घेण्यासारखे आकर्षक असे काही ना काही बनवून त्यांना दिले तर नक्कीच ते आवडीने खातात. हा अनुभव कितीतरी आयांना येत असतोच. लांब कशाला,माझा मुलगा मंदारच्या बाबतीतही हा अनुभव आला आहे. अगदी रोजच्या पोळीचे सुद्धा कधी ABCD, कधी त्रिकोण,चौकोन,स्टार तर कधी प्राणी,पक्षी यांचे आकार केले की साधी पोळी सुद्धा त्याच्या नादाने जायची पोटात. त्यामुळे असे सतत काहीतरी नवीन बनवावे लागतेच तेही टेस्टी! आज आपण असाच एक पदार्थ बनवू . जो पाहून मुलेच काय, मोठ्यांनासुद्धा राहवणार नाही. उत्कंठा वाढली आहे ना? चला मग...



साहित्य: अर्धी वाटी कणिक, अर्धी वाटी मैदा किंवा संपूर्ण कणिक वापरली तरी चालते, 2 चमचे तांदुळाची पिठी किंवा कॉर्न फ्लोअर, खमंग करायचे असतील तर 1 चमचा ओवा आणि पाव चमचा हिंग घालावा व चवीनुसार मीठ घालावे. आणि गोडाची फुले बनवायची असतील तर अगदी किंचीत चवीसाठी फक्त मिठ घालावे. 2 चमचे गोड करताना तुपाचे मोहन घालावे ,तिखट, मिठाचे करताना तेलाचे मोहन घालावे, वरून भूरभुरण्यासाठी तिखट, चाट मसाला .

कृती: प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये कणिक,मैदा, पिठी, मिठ, दोन्ही हातांवर चोळून ओवा,हिंग, तेलाचे एकदम कडकडीत मोहन घालावे. नंतर लागेल तसे थोडे थोडे आणि घालत त्याचा घट्ट गोळा बनवून घ्यावा व तो 10 मिनिटे घट्ट झाकून ठेवावा. नंतर तो पुन्हा छान मळून घेऊन तेलाचा हात लावून त्याचे पोळी सारखे उंडे करून पातळ पोळी लाटून घ्यावी. आता या पोळीच्या चारी बाजू सुरीने कापून मधला चौकोनी भाग ठेवावा. आता त्याच्या साधारण दीड ते दोन पेरा एवढ्या लांबट पट्ट्या कापून घ्याव्यात. नंतर एकेक पट्टी घेऊन त्याची थोडी बाजू एकाबाजूने तशीच ठेवून बाकी पट्टीला शक्य तितक्या जवळ जवळ सुरीने कट द्यावेत. सजावटीच्या झिरमीळ्या बनवतो त्याप्रमाणे बनवून त्याला गोल वेटोळे देऊन घट्ट रोल बनवावा म्हणजे खाली देठ आणि वरती पाकळ्या प्रमाणे दिसेल. हवे तर हिरवा खाण्याचा रंग देठाना लावावा. अशा प्रकारे सगळी फुले बनवून ठेवावीत. नंतर गॅसवर कढई ठेवून फुले तळण्यासाठी त्यात तेल घालावे. तेल गरम झाले की ही फुले क्रीस्पी होईपर्यंत मस्त तळून घ्यावीत. मस्त केशरी,तांबूस रंगाची ही फुले चाळणीत काढून तेल निथळले की वरून आवडीनुसार तिखट, चाट मसाला भुरभुरून सर्व्हिंग डिशमध्ये काढून सर्व्ह करावीत. ही गरम पण छान लागतातच पण थंड झाल्यावर जास्त क्रीस्पी बनतात आणि मस्त कुरकुरीत चटपटीत लागतात.

वैशिष्ट्य:

ही फुले साधारण तिखटमीठाच्या शंकरपाळी सारखी लागतात. चाट मसाल्यामुळे जास्तच सुरेख लागतात. भरपूर दिवस टिकतात. गौरी..गणपतीला,चैत्रगौरीला पुढे फराळाचे पदार्थ ठेवतात तेंव्हा ही लक्षवेधून घेतात.

या प्रमाणेच बनवून साजूक तुपात तळून वरती पिठीसाखर,वेलची पुड भुरभूरावी किंवा साखरेचा किंचीत लिंबू पिळून , वेलची, केशर घालून दोनतारी पाक करून त्यात फक्त बुडवून काढून सुकवले तरी हि गोडाची फुले खूप सुंदर,लागतात.पाकाच्या चमकदारपणा मुळे खूपच आकर्षक दिसतात. पाहूनच खाण्याचा मोह आवरणार नाही आणि एकदा सुरुवात केली की मोह आवरणे कठीण होते.

सौ. स्नेहा मुसरीफ,पुणे.

















दिवाळी

लोपला अंधार सारा,
माखली तेजात नगरी
उजळले सारेच रस्ते,
वाहती आनंदलहरी

लागले लाखो दिवेही,
जाळण्या काळोख सारा
धुंद तो आला सुगंध,
कुठुनसा घेऊन वारा

शोभतो आकाशकंदिल,
टांगला उंचावरी
टाकला दारी सडाही,
बांधले तोरण दारी

होई ते अभ्यंगस्नान,
लावुनी उटने सुगंधी
तप्त ते पाणी पहाटे,
चढविते न्यारीच धुंदी

बोचरी थंडी गुलाबी,
फुलविते रोमांच अंगी
रांगोळी दारामधे ती,
रंगुनी साऱ्याच रंगी

रोषणाई हा खरोखर,
प्राण या दिपोत्सवाचा
शुभशकुनी सोनकिरणे,
नाश करिती दानवांचा

चाहती आबालवृद्ध,
गोड खाऱ्या त्या फराळा
वाढवी गोडी सणाची,
मित्र नि आप्तांचा मेळा

काय मी वर्णु दिवाळी,
सोहळा परमोच्च आहे
मानवाच्या संगतीने,
देवसुद्धा वाट पाहे

जे भुकेले भोवताली,
पोरके असती किती
वाटुया आनंद त्यांना,
एवढी तुम्हा विनंती

- शार्दुल हातोळकर



उभ्या जगाचा पोशिंदा

अविरत कष्ट भाळी
पाणी रक्ताचं करतो
उभ्या जगाचा पोशिंदा
बीज सुखाचं पेरतो

स्वप्न गोड भविष्याची
खुल्या डोळ्यांनी पेरणी
निसर्गाचा हेलकावा
जीवा नित्याची झुरणी

समर्पित जीवनाने
फुलवितो रानमळा
त्याग अन दातृत्वाचा
मूर्तिमंत तो सोहळा

मानी पंढरी तो शेती
पीक डोले विठू जणू
आभाळाची माया त्याची
भक्ती ठायी त्याचे तनू

चंद्रमौळी घर साधं
ओठी कष्टाची भाकरी
श्रम हीच पूजा मानी
काळ्या मातीची चाकरी

नसे दौलत अमाप
परी मनगटी बळ
सहनशीलता थोर
झेली संकटे वादळ

जगासाठी ते राबणं
हिरा कष्टाच्या कोंदणी
सुखी ठेव बळीराजा
हीच देवाला मागणी

- सुचिता विजय कराळे
राजगुरुनगर, तालुका :खेड,जिल्हा :पुणे फोन नंबर 8087937872

चवदार चिवडा कटलेट्स

दिवाळी संपली की काही दिवसात बाकी सर्व फराळ सुद्धा संपतो .पण शेवटी मात्र चिवडा शिल्लक राहतो . मग दरवर्षी चिवड्यावर कांदा ,टोमॅटो ,कोथिंबीर ,लिंबू घालून सुक्क्या भेळेचा कार्यक्रम ठरलेला असतो .

चिवड्याच्या तळाशी शेवटी मोहरी जिरे, तीळ आणि मसाला राहिलेला असतो तो खरच खूप खमंग आणि टेस्टी असतो पण मीठ सुद्धा थोडे जास्त रहात असल्यामुळे थोडासा स्ट्रॉंग व खारट असा लागतो. त्यामुळे ते खायलाही नको वाटते आणि फेकून द्यायलाही नको वाटते .आधी चिवडा खाऊन कंटाळा आलेला असतो, पुन्हा संपवण्यासाठी भेळ करूनच खावा लागतो. त्याऐवजी कटलेट्स करून तर पहा! नावीन्यपूर्ण तर वाटेलच पण मुलांपासून मोठ्यांपर्यंत हे कटलेट्स खाऊन नक्कीच खुश होतील. मग यंदा हे कटलेट्स करून पाहाच ..

साहित्य : २ वाट्या चिवडा , 2 उकडलेले बटाटे , 1 मोठा कांदा , 1 गाजर , 1 सिमला मिरची , अर्धा चमचा आले लसूण पेस्ट ,अर्धी वाटी कोथिंबीर ,अर्धी वाटी बारीक रवा किन्वा ब्रेडक्रम्स, शालोफ्राय करण्यासाठी तेल.

डिप बनवण्यासाठी साहित्य : २ वाट्या गोड दही, 1 चमचा मेयोनीज, 1 चमचा साखर ,पाव चमचा चाट मसाला, पाव चमचा मिक्सहर्ब्ज.

कृती : प्रथम डिप बनवूनघ्यावे म्हणजे मुरून फ्रीझमध्ये थंड झाले की टेस्टी बनते. त्यासाठी दह्यात सर्व साहित्य मिक्सकरून व्यवस्थित फेटून साखर विरघळली की फ्रीझ मध्ये थंड होण्यासाठी ठेवावे. कटलेट्स बनवण्यासाठी बटाट्याची साले काढून कुस्करून घ्यावा. गाजर खिसून घ्यावे. मग कांदा,सिमलामिरची,कोथिंबीर बारीक कट करून घ्यावी. आता मोठ्या पसरट भांड्यात चिवडा घ्यावा व त्यात सगळ्या भाज्या घालून आले लसूणपेस्ट घालून थोडेसे मीठ घालावे. चिवड्यात तळाशी जास्तीचे मीठ असते हे लक्षात घेणे महत्वाचे आहे. मग सर्व व्यवस्थित मिक्स करून घ्यावे. आवश्यक असल्यास थोडासा पाण्याचा शिपका मारुन आवडीनुसार कटलेट्स टिक्की बनवून ठेवाव्यात. नंतर डिश मध्ये रव्यात किंवा ब्रेडक्रम्स मध्ये व्यवस्थित घोळवून ठेवून तव्यावर तेलावर क्रिस्पी होईपर्यंत फ्राय करून कटलेट्स बनवावेत. हे कटलेट्स डिप बरोबर खाण्यास द्यावेत .

वैशिष्ट्य : चिवडा मसाल्यामुळे कटलेटसना एक वेगळीच खमंग चव येते .आणि करायला सोपा ,खायला छान पदार्थ बनवल्याचे समाधानही मिळते .कमी कष्टात झटपट पोट भरीची अशी ही डिश असल्यामुळे करणारे आणि खाणारे दोघेही खुश होणारच आणि इतक्या कष्टाने,खर्चाने बनवलेला चिवडा पूर्णपणे खाल्ला यांचे समाधान मिळते ते काही वेगळेच असते . यात कोबी , कांदापात ,मटार , स्वीटकोर्न अशा आवडीच्या भाज्या किंवा मोड आलेली



कडधान्य. .मूग ,मटकी वगैरे पण घालू शकतो. भाज्यांमुळे टेस्ट सुद्धा छान येते आणि पोटही भरते .शिवाय पौष्टीकता सुद्धा असतेच . दही शक्यतो गोडच वापरावे म्हणजे टेस्ट तर छान लागतेच शिवाय चिवड्यामुळे कोणाला ऍसिडिटीचा त्रास ही होणार नाही .

- सौ .स्नेहा मुसरीफ ,पुणे.

AN ISO 9001-2008 Certified
यवतमाळ जि.प.कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या.यवतमाळ र.नं.१०९
मुख्यालय - स्वस्तिक चौक, गोधणी रोड, यवतमाळ
आपल्या कष्टाची रक्कम आपण आमचेकडे ठेवा... आणि बिनधास्त रहा...!
www.yzpecs.org वर्धा, पुसद, दारव्हा, आर्णी, पांढरकवडा महाराष्ट्रातील नंबर १ ची पतसंस्था
संस्थेची सांपत्तीक स्थिती
कर्ज २३७.१० कोटी
गुंतवणुक १८८.२८ कोटी
नफा ६.७० कोटी
सभासद भाग भांडवल ३३.९६ कोटी
ठेवी ३४०.७७ कोटी
राखीव निधी ४२.१५ कोटी
मुख्य कार्यालय
महेश लक्ष्मणराव सोनेकर
अध्यक्ष
ही दिवाळी आपणा सर्वांच्या जिवनात आनंद, आरोग्य, समृध्दी आणि यश घेऊन येवो !
शुभ दिपावली
संस्थेच्या सर्व सभासदांना व ठेविदारांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!
संस्थेमध्ये वैयक्तिक लॉकर सुविधा, त्वरा करा मोजकेच लॉकर शिल्लक...!
सातत्याने ऑडीट वर्ग 'अ'
ठेवीवर आकर्षक % व्याज दर
सभासदांसाठी 9% व्याज दराने गृह कर्ज
लॉकर डिपॉझीट १०००० /- रूपये राहील यावर बचत खात्याप्रमाणे व्याज दिले जाईल.
य.जि.प.कर्मचारी पतसंस्थेची सदैव साथ.... आपल्या प्रगतीस मदतीचा हात....
ठेवीकरीता संपर्क : विनोद तवकर ९८२२५७२१५७
लॉकरकरीता संपर्क : सुभाष तावरी ९४०३४९०५३४
लॉकर सभासद, ठेविदार व इतर सर्व लोकांना घेण्याची मुभा
संजय विश्वनाथजी गावडे उपाध्यक्ष
संजय गुलाबराव विहाडे सचिव
आपल्या पेशाची १००% खात्री..... कारण आमच्याकडे आहे गावागावातून वसुली
आपल्या सहकार्याबद्दल सर्व सभासद व ठेवीदारांना... धन्यवाद ..!
शरद घारोड शाखा प्रमुख,दारव्हा | अशोक चटप शाखा प्रमुख, वर्णी | विनोदकुमार कदम शाखा प्रमुख-पुसद | गजानन पोयाम शाखा प्रमुख-आर्णी | सौ. विजया राऊत शाखा प्रमुख, पांढरकवडा | स्वप्नील फुलमाळी सांस्कृतीक भवन प्रमुख
संचालक
मुकेश भोयर, प्रदिप मोहटे तुलशिदास आत्राम, नदिम पटेल, विलास टोंगे, अभिजीत ठाकरे, सचिन ठाकरे, तेजस तिवारी, सुनिता गुघाणे (बुटले) मारोती राजगडकर (सरव्यवस्थापक)
विश्वास + सुरक्षितता = जि. प. पतसंस्था

THE YAVATMAL URBAN CO-OP. BANK LTD., YAVATMAL
दि यवतमाळ अर्बन को-ऑप.बँक लि., यवतमाळ
॥ साहसे श्री : प्रतिवसति ॥
मुख्य कार्यालय : एल.आय.सी. चौक, गार्डन रोड, यवतमाळ 445001 फोन : 07232-244241, 243703, 237442
Mail - ho_adm@yavatmalurban.bank.in Website - www.yavatmalurban.bank.in
दि यवतमाळ अर्बन बँक तर्फे बँकेचे सर्व ग्राहक, सभासद व हितचिंतकांना दीपोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा !
अमृत वर्षा
पुनर्गुंतवणूक ठेव योजना
6.60%* योजनेचा सामान्य व्याजदर
7.10%* जेष्ठ नागरिकांकरिता व्याजदर
गुंतवणूक कालावधी 444 दिवस
अंतिम तारीख - 31 मार्च 2027 पर्यंत
आम्ही जपतो विश्वासाचा वारसा
डॉ. नितीन खर्चे अध्यक्ष | अजिंदरसिंह चावला उपाध्यक्ष | श्रीधर कोहरे मुख्य कार्यकारी अधिकारी
— संचालक —
श्री. अजय विठ्ठलदासजी मुंधडा, श्री. आशिष हरिहरराव उत्तरवार, श्री. प्रशांत अरूण माधमशेट्टीवार, श्री. संजय चिंतामणराव डेहणकर, श्री. प्रमोद मधूकरराव धुर्वे, ॲड. श्री. प्रफुल्लसिंह लक्ष्मणसिंह चौहान, श्री. गोवर्धन दयाराम राठोड, श्री. परिमल प्रेमकुमार देशपांडे, डॉ. श्री. महेश दामोधर सारोळकर, श्री. वसंता रामजी सुपारे, श्री. संतोष विष्णूकांत पेन्शनवार, श्रीमती मिरा राजेश घाटे, सौ. शिला राजेश्वर निवल, श्री. नरेंद्र देवराव देशपांडे (तज्ञ संचालक), ॲड.श्री. संतोष विठ्ठलराव कुचनकर (तज्ञ संचालक)

हिवताप निर्मूलन कर्मचारी सह. पतसंस्था
यवतमाळ र.नं. १४१७ तर्फे
सर्व सभासद, ठेवदारांना आणि समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!
प्रकाश मुडाणकर अध्यक्ष | कु. रेश्मा सोंगर उपाध्यक्ष | आशिष देशमुख सचिव
संचालक मंडळ :- संदीप कुटे, धिरज पिसे, गणेश मेहरे, अभय पोलादे, बाबुराव जारंडे, रामनाथ राठोड, मंगेश झामरे, प्रणीता रोडे, तज्ञ संचालक सुभाष वानरे
पत्ता - पवनसुत हार्डवेस, अवधूतवाडी, यवतमाळ

तेजोमय दिव्यांची सुंदर प्रभा उजळली,
आनंदाची नवी पहाट आयुष्यात सजली.
तुम्हाला व तुमच्या परिवारास दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!
समस्त नागरिकांना
दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!
श्री. बाळासाहेब कामारकर
जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, यवतमाळ जिल्हा

भुताच्या शोधासाठी फ्रान्सिस हॅल्झेन या शास्त्रज्ञाला नोबेल पुरस्कार!

भूत दिसत नाही, स्पर्श करता येत नाही... पण न्यूट्रिनो मात्र विज्ञानाने शोधून दाखवला! भुतांच्या गोष्टी ऐकल्या, भुतांचे चित्रपट पाहिले, एखाद्या निर्जन वाड्यात भूत असल्याच्या कहाण्याही ऐकल्या असतील. काहींनी तर भूत पाहिल्याचा दावाही केला असेल! भूत असते, पण ते दिसत नाही, त्याला स्पर्श करता येत नाही, ते अचानक येते आणि अदृश्य होते, अशी एक कल्पना समाजात अनेक वर्षांपासून रुजलेली आहे. चित्रपट, मालिका, लोककथा आणि काही भोंदू बाबांच्या कथित चमत्कारांमुळे या कल्पनेला आणखी खतपाणी मिळत असते. भूतबाधा, भानामती, करणी, चेटूक अशा गोष्टींच्या नावाखाली अनेकदा सामान्य माणसांच्या भीतीचा बाजारही मांडला जातो. पण जरा थांबा! भुतांच्या या अदृश्य दुनियेचा उल्लेख करण्याचे कारण म्हणजे विज्ञानाच्या जगात नुकतीच घडलेली एक भन्नाट घटना! २०२६ चा भौतिकशास्त्रातील नोबेल पुरस्कार प्रा. फ्रान्सिस हॅल्झेन (Francis Halzen) यांना मिळाला आहे. आता तुम्ही म्हणाल, त्यांनी नेमके कोणते भूत पकडले?



तर त्यांनी कोणत्याही वाड्यातील, स्मशानातील किंवा झाडावरच्या भुताचा शोध लावलेला नाही. त्यांनी शोध घेतला आहे तो ब्रह्मांडात मुक्तपणे संचार करणाऱ्या 'न्यूट्रिनो' (Neutrino) नावाच्या सूक्ष्म कणांचा! या कणांना विज्ञानाच्या भाषेत गंमतीने 'घोस्ट पार्टिकल्स' (Ghost Particles) अर्थात भुतासारखे अदृश्य कण असे संबोधले आहे आपल्या समाजात भुताबद्दल एक लोकप्रिय समज आहे. ते अस्तित्वात असते, पण दिसत नाही; त्याला स्पर्श करता येत नाही आणि ते आपल्यातून आरपार जाते, याला चित्रपटातून आणखी खतपाणी घातले जाते, फ्रान्सिस हॅल्झेन यांनी शोध लावलेल्या न्यूट्रिनोचे वैशिष्ट्यही काहीसे याच्याशी मिळतेजुळते आहे. हे अतिशय सूक्ष्म, विद्युतभार नसलेले आणि अत्यंत कमी वस्तुमान असलेले कण आहेत. ते सामान्य पदार्थांशी फारच कमी परस्परसंवाद करतात. त्यामुळे दर सेकंदाला अब्जावधी न्यूट्रिनो आपल्या शरीरातून आरपार जात असतात; पण आपल्याला त्याची कोणतीही जाणीव होत नाही. म्हणूनच त्यांना 'घोस्ट पार्टिकल्स' असे टोपणनाव दिले आहे .

मात्र इथे एक महत्त्वाचा फरक समजून घेतला पाहिजे. न्यूट्रिनो हे विज्ञानाने प्रयोगांद्वारे सिद्ध केलेले भौतिक कण आहेत. त्यांचे अस्तित्व मोजता येते, त्यांच्या हालचालींचा अभ्यास करता येतो आणि योग्य उपकरणांच्या साहाय्याने त्यांना शोधताही येते. याउलट भुतांच्या अस्तित्वाला आजपर्यंत विश्वसनीय आणि पुनरावृत्ती करता येण्याजोगा वैज्ञानिक पुरावा मिळालेला नाही. म्हणजेच, न्यूट्रिनो हे खरे; पण त्याच्या नावातील भूत हा केवळ उपमेचा भाग आहे!

प्रा. फ्रान्सिस हॅल्झेन यांनी १९८८ मध्ये एक आगळीवेगळी कल्पना मांडली. दक्षिण ध्रुवावरील खोल आणि स्वच्छ बर्फामध्ये न्यूट्रिनो शोधण्यासाठी प्रचंड मोठी प्रयोगशाळा उभारता येईल, असा त्यांचा विचार होता. या कल्पनेतून पुढे 'आइसक्यूब न्यूट्रिनो ऑब्झर्व्हेटरी' (IceCube Neutrino Observatory) ही अद्भुत वैज्ञानिक वेधशाळा उभी राहिली. अंटार्क्टिकाच्या बर्फामध्ये सुमारे एक घन किलोमीटर क्षेत्रात हजारो प्रकाशसंवेदक बसवण्यात आले आहेत. न्यूट्रिनो एखाद्या अणुकेंद्राशी क्वचितच टक्कर घेतो. अशा वेळी निर्माण होणाऱ्या क्षीण प्रकाशाचा मागोवा हे सेन्सर्स घेतात आणि त्यावरून त्या अदृश्य कणाचा शोध लावला जातो. म्हणजे भूत शोधण्यासाठी मांत्रिक, लिंबू, नारळ, राख किंवा अंगारा लागत नाही; तर लागतात अत्याधुनिक उपकरणे, गणित, भौतिकशास्त्र आणि अनेक वर्षांचे संशोधन! याच संशोधनातील निर्णायक योगदानाबद्दल फ्रान्सिस हॅल्झेन यांना २०२६ चा नोबेल पुरस्कार नुकतेच ओक्टोंबर महिन्यात देण्यात आला. त्यांच्या संशोधनामुळे विश्वातील अतिऊर्जावान घटनांचा अभ्यास करण्यासाठी विज्ञानाला एक नवी खिडकी खुली झाली आहे. मग खरे भूत कोणाचे? विज्ञानाचे की अंधश्रद्धेचे? आता थोडा विचार करूया. एखाद्या निर्जन घरात आवाज आला, झाडाची सावली हलली, रात्री एखादा विचित्र प्रकाश दिसला किंवा कुणाला अनोखा अनुभव आला, तर लगेच त्याला भूताचे नाव देण्याची घाई कशासाठी? त्या घटनेमागे नैसर्गिक, पर्यावरणीय, भौतिक किंवा मानसिक कारण असू शकते का, याचा शोध घेणे अधिक महत्त्वाचे नाही का? भुतांच्या गोष्टी सांगणारे चित्रपट मनोरंजनासाठी असतात. त्यातील दृश्ये, ध्वनी आणि प्रसंग हे प्रेक्षकांच्या मनात भीती निर्माण करण्यासाठी रचलेले असतात. परंतु चित्रपटातील कल्पनांना वास्तव समजणे किंवा एखाद्या भोंदू बाबाच्या दाव्याला वैज्ञानिक सत्य मानणे योग्य नाही. अंधश्रद्धेचा सर्वांत मोठा फायदा कोणाला होतो? तर लोकांच्या भीतीवर आपली दुकानदारी चालवणाऱ्यांना! जिथे प्रश्न विचारण्याची सवय संपते, तिथे अंधश्रद्धेला सुरुवात होते. आणि जिथे पुरावा मागण्याची हिंमत निर्माण होते, तिथे विज्ञान जन्माला येते. अदृश्य म्हणजे अलौकिक नव्हे! या संपूर्ण विषयातून एक महत्त्वाचा बोध घेण्यासारखा आहे. आपल्या डोळ्यांना दिसत नाही म्हणून एखादी गोष्ट अस्तित्वात नाही, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे एखादी गोष्ट दिसत नाही म्हणून ती भूत, चमत्कार किंवा अलौकिक शक्ती आहे, असेही मानता येत नाही. हवा दिसत नाही, पण तिचे अस्तित्व आपल्याला माहीत आहे. गुरुत्वाकर्षण दिसत नाही, पण त्याचा परिणाम अनुभवता येतो. रेडिओ लहरी दिसत नाहीत, पण त्यांच्यामुळे आपण जगाशी जोडले जातो. आणि न्यूट्रिनो तर आपल्या शरीरातून आरपार जात असूनही आपल्याला त्याची जाणीव होत नाही. म्हणूनच प्रत्येक अदृश्य गोष्टीला भूत समजण्याऐवजी तिच्यामागील विज्ञान समजून घेण्याची गरज आहे. भूत आहे की नाही, या चर्चेपेक्षा भुताच्या नावाखाली समाजात निर्माण होणारी भीती, अंधश्रद्धा आणि आर्थिक शोषण संपवणे अधिक महत्त्वाचे आहे. शेवटी एवढेच... भूत शोधण्याच्या नादात आयुष्य घालवण्यापेक्षा विज्ञानाच्या मदतीने ब्रह्मांडातील अदृश्य कण शोधणे केव्हाही अधिक उपयुक्त! फ्रान्सिस हॅल्झेन यांनी दक्षिण ध्रुवाच्या बर्फात न्यूट्रिनोचा शोध लावला आता आपण आपल्या समाजातील अंधश्रद्धेच्या अंधाराचा माग काढायला हवा. कारण विज्ञानाचे खरे सामर्थ्य केवळ अदृश्य कण शोधण्यात नाही, तर माणसाच्या मनातील अज्ञानाचा अंधार दूर करण्यात आहे! भूत दिसत नाही म्हणून त्यावर विश्वास ठेवायचा की न्यूट्रिनो दिसत नाही म्हणून त्याचा वैज्ञानिक शोध घ्यायचा, हा फरक समजून घेणे म्हणजेच वैज्ञानिक दृष्टिकोन!

- मनोज पवार यवतमाळ
९४२२८६५८१०

पान १ वरून

संतांच्या दृष्टीने अंतर्बाह्य शुद्धी

जेव्हा आपण या सणाच्या अध्यात्मिक अंगाकडे वळतो, तेव्हा संतांचे विचार आपल्याला एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जातात. देवाविना अन्य कशाचीही लालसा नसणाऱ्या संतांची दिवाळी ही ऐहिक वैभवाची मोहमाया न बाळगता दैवी अनुभूतीच्या परिपूर्णतेने नटलेली असते. संतश्रेष्ठ नामदेवांच्या लाडक्या दासी जनबाईंनी आपल्या ओव्यांमध्ये भक्तीचा जो जिव्हाळा मांडला आहे, तो मनाला भारावून टाकणारा आहे

सण दिवाळीचा आला। नामा राउळासी गेला ॥
हाती धरूनी देवासी । चला आमुच्या घरासी ॥
देव तेथुनी चालले । नामयाच्या घरी आले ॥
गोणाईने उटणे केले। वामाशेटीने स्नान केले ॥
पदर काढिला माथ्याचा। बाळ पुशिला नंदाचा ॥
हाती घेऊन आरती। चक्रपाणी ओवाळती ॥
जेऊनिया तृप्त झाले । दासी जनीने विडे दिले ॥

भक्ताच्या हाकेने वैकुंठ सोडून प्रत्यक्ष देव जेव्हा साध्या कुटीत येतो, तेव्हा माता गोणाई प्रेमाने त्याला उटणे लावून स्नान घालते आणि वात्सल्याने आरती ओवाळते. हा आनंद ऐहिक सुखांच्या पलीकडचा असतो. याच सुरात संत कबीर आपल्या दोह्यामध्ये बाह्य दिखाव्यावर कठोर प्रहार करत अंतरातल्या ज्ञानाचा दिवा लाटण्याचा संदेश देतात.

दीप जलाए क्या हुआ, दिल का बुझा प्रकाश।
जब तक भीतर ज्ञान ना, भटकत फिरे निराश॥

जोपर्यंत मनातील अज्ञानाचा आणि अहंकाराचा अंधकार नष्ट होत नाही, तोपर्यंत बाहेरील लाखो दिवे लावून काहीही निष्पन्न होत नाही. जेव्हा अंतःकरणातील ज्ञानरूपी दिवा प्रज्वलित होतो, तेव्हाच खरी दिवाळी साजरी होते.

संत ज्ञानेश्वर महाराज गीतेच्या 18 व्या अध्यायात दीपावलीतील दिव्याचे अद्वैत दर्शन घडवताना अत्यंत सुसंवाद साधतात:

दीपा आगिलु मागिलु ।
सूर्यु धाकुटा वडीलु ।
अमृतसिंधु खोलु ।
उथळु कायसा ॥

ज्ञानदेवांच्या मते, दिवा आधी कोणता आणि मागचा कोणता? सूर्य लहान की थोर? अमृतसागर सखोल की उथळ? याबद्दल व्यर्थ चर्चा करण्यात अर्थ नाही. जशी पारिजाताच्या (प्राजक्ताच्या) फुलांत ताजी आणि शिळी असा भेद करता येत नाही, कारण त्यांचा सुगंध सारखाच असतो, तसेच ज्ञानाच्या आणि प्रकाशाच्या प्रवाहात कोणताही भेद नसता. सूर्याचा जो प्रकाश देण्याचा धर्म आहे, तोच दिवाही कर्तव्यबुद्धीने बजावत असतो. दिवा म्हणजे जणू लहान सूर्यच! याच विचारातून संत ज्ञानेश्वर पसायदाना मध्ये समस्त प्राणिमात्रासाठी प्रार्थना करतात.

दुरितांचे तिमीर जावो ।
विश्व स्वधर्मे सूर्ये पहो ॥
जो जे वांछिल तो ते लाहो ।
प्राणिजात ॥

सामान्य माणसाच्या जीवनातील अज्ञानाचा अंधार नाहीसा होवो, संपूर्ण विश्वाला त्याच्या स्वधर्मीय तेजाची प्रचिती मिळो आणि प्रत्येक व्यक्तीला त्याचे इप्सित साध्य होवो, ही त्यांची तळमळ आहे. गीतेच्या अर्थाचा प्रकाश सर्वांच्या अंगणात पडावा, हीच ज्ञानेश्वरांची खरी दिवाळी आहे.

इये मराठीचिये नगरी ।
ब्रह्मविद्येचा सुकाळू करी।
घेणे-देणे सुखचि वरी ।
हो देई जगा ॥

संतांनी महाराष्ट्रभूमीतील लोकांना हा जो ज्ञानाचा आणि विवेकाचा प्रकाश दिला आहे, तो नंदादीप आपल्या प्रत्येकाच्या मनाच्या देव्हाऱ्यात सदैव तेवत राहो. आरोग्याची धन्वंतरी, समृद्धीचा कुबेर आणि समतेच्या प्रकाशाने नटलेली ही दिवाळी आपल्या सर्वांच्या आयुष्यात चैतन्य आणि आनंदाची सहस्रकिरणे घेऊन रोज लखाखत राहो, हीच या मंगलपर्वाची परमोच्च अनुभूती आहे.





तेजोमय दिव्यांची सुंदर प्रभा उजळली,
आनंदाची नवी पहाट आयुष्यात सजली.
तुम्हाला व तुमच्या परिवारास दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

जिल्ह्यातील शेतकरी बांधव
तथा समस्त नागरिकांना

दीपावलीच्या
खूप खूप शुभेच्छा..!



ॲड. सचिन नाईक
अध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी,
यवतमाळ जिल्हा

वर्तमानपत्र...कालचे आणि आजचे

आज सकाळी जाग आली ती ' पेपर... ' अशा आवाजाने ! मग बेल वाजली आणि दरवाजा उघडला तर दारात ताजे ताजे वर्तमानपत्र होते . मन एकदम भूतकाळात गेले . आम्ही लहान असताना वाड्यात राहायचो . एकूण सहा कुटुंब राहायचो . पण एकच कुटुंब असल्यासारखे वाटायचे. अगदी छोट्या छोट्या गोष्टीही शेअर केल्या जायच्या. सुख दुःख , सणसमारंभ उत्साहात साजरे केले जायचे . हिच गोष्ट न्युज पेपरच्या बाबतीतही होती. नानाकुलकर्णी आणि जोशी आप्पा दोघांकडेच पेपर घेतला जायचा पण त्यावर हक्क म्हणजे सर्वांचाच असायचा . जोशीकाका बरेचदा फिरतीवर असायचे , काकूंना सकाळी पाणी यायचे त्यामुळे ते भरण्यापासून ते मुलांच्या शाळांचे डबे बनवण्यापर्यन्त इतकी कामे असायची की त्यांचा पेपर दुपारपर्यंत बाकी साऱ्या शेजाऱ्यांच्या घराघरात फिरून यायचा . मग तो पेपर सर्वात आधी कोण वाचणार यासाठी कुंभारे आजोबा आणि नेने काकांची चढाओढ असायची . पहाटे उठून पेपरची वाट पहायचे आणि आला की झडप घालून घ्यायचे . मग ज्याला आधी मिळेल त्याला मॅरेथॉन जिंकल्यासारखे वाटायचे . नंतर मात्र मग दोघेही जिन्यातल्या पायरीवर बसून एकेक पान आळीपाळीने वाचायचे . आधी हक्क घरातील कुटुंब प्रमुखाचा असायचा. त्यानंतर सवडी नुसार बाकी लोकांचा ! बायकाना तर सर्वात शेवटी कामाच्या व्यापातुन वेळ मिळाला की मगच दुपारी मिळायचा . खुप गंम्मत वाटते आतासुद्धा ते आठवल्यावर . पण मुद्दा हा ,की वर्तमानपत्र म्हणजे सर्वांनचेच इतके लाडके होते . तेंव्हाही आणि आताही . आता काळानुसार सर्व गोष्टी बदलतातच, तसे तसे यांचेही स्वरूप बदलत आहे .



वृत्तपत्रांचा इतिहास युरोपमध्ये सुरू झाला होता 6 जानेवारी 1832 रोजी बाळशास्त्री जांभेकर आणि भाऊ महाजन यांनी 'दर्पण' आणि 'दिग्दर्शन' नावाची नियतकालिके सुरू केली. हा पेपर द्विभाषिक पाक्षिक इंग्रजीत बॉम्बे दर्पण या नावाने प्रकाशित झाला. बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर हे मराठी भाषेतील आद्य पत्रकार म्हणुन ओळखले जातात . भारतातील वृत्तपत्रे सहसा संध्याकाळी उशिरा किंवा पहाटेच्या वेळेत छापली जातात, सहसा रात्री 10 ते पहाटे 4 च्या दरम्यान ती छापली जातात . त्यामुळे सकाळी लवकर ती वाचकांपर्यंत पोहोचतात . भारतातील प्रत्येक 22 अनुसूचित भाषांमध्ये आणि देशभरात बोलल्या जाणाऱ्या इतर अनेक भाषांमध्ये प्रकाशने तयार केली जातात. हिंदी भाषेतील वृत्तपत्रे सर्वात जास्त प्रसारित आहेत, त्यानंतर इंग्रजी आणि तेलगू आहेत. वर्तमानपत्रांमध्ये वर्तमान घडामोडी आणि स्वारस्य असलेल्या विषयांवरील माहिती असते. वर्तमानपत्रांमध्ये राजकारण, व्यवसाय, क्रीडा, मनोरंजन, विज्ञान, कला ,हवामानाचा अंदाज यासारख्या विविध विषयांचा समावेश होतो. वर्तमानपत्रांमध्ये मते, लेख, संपादकीय स्तंभ, हवामान अंदाज, शब्दकोडे, राजकीय व्यंगचित्रे, सार्वजनिक सूचना यांचाही समावेश असतो. वर्तमानपत्रांमध्ये शब्दकोडे, दैनिक पत्रिका, सार्वजनिक सूचना आणि बरेच काही समाविष्ट आहे. वर्तमानपत्रांमध्ये मत स्तंभ, हवामान अंदाज, स्थानिक सेवांचे पुनरावलोकन, मृत्युलेख यांचाही समावेश असतो. जगभरात होणाऱ्या दररोजच्या घडामोडींची माहिती , लेख , त्यावरील मते , शब्दकोडे यांचाही त्यात समावेश असतो . लहान मुलांना पण वाचनाची आवड निर्माण होऊन मनोरंजनही व्हावे म्हणून चित्रे रंगवणे ,कोडी , विनोद , हितोपदेशाच्या गोष्टी यासारख्या गोष्टींचाही दररोजच्या नसला तरी सुट्टीच्या दिवशी तरी समावेश असतो . दर्पण, मराठा, प्रभाकर, लोकमत, लोकसत्ता, महानगर, महानायक, महाराष्ट्र टाइम्स, नव काल, नवराष्ट्र,आणि यासह मराठी भाषेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुरु केलेले 'मूकनायक' हे वर्तमानपत्र खूपच गाजले . त्यांनी प्रबुद्ध भारत ,बहिष्कृत भारत ,समता ,जनता ही वर्तमानपत्रे पण खुप प्रभावी होती . स्वातंत्रपूर्व काळात वर्तमानपत्र हे कोणत्याही धारदार शस्त्रापेक्षा कमी नव्हते . अनेक चळवळी त्यामुळेच पेटल्या गेल्या , आणि त्यामुळेच आजचा स्वातंत्र भारताचा सोनेरी क्षण आपण उपभोगत आहोत . लोकमान्य टिळकांनी सुरु केलेले केसरी , मराठा ही वर्तमानपत्र, त्यातील टिळकांच्या जहाल लेखणीपुढे इंग्रजही नमले . इतकी शक्ती या लेखणीरूपी शस्त्रात आहे . उगाच नाही पत्रकारितेला लोकशाहिचा चौथा स्तंभ म्हणत ! आज त्यांच्या बरोबरच लोकमत , नवशक्ती प्रहार, पुढारी, महासागर, राष्ट्रमत, सम्राट, सैमात, सकाळ, तरुण भारत यासारखी असंख्य वर्तमानपत्र लोकप्रिय आहेत.पूर्वी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ही जास्त प्रभावी होती पण अजूनही त्यांची गरज संपलेली नाही . आणि संपणारही नाही . लोकशाही असली तरीलोकांच्या मागण्या ,त्यांचे विचार , नेते मंडळीची कार्ये , टिका, विरोधीपक्ष, सत्ताधारी पक्ष यांचे समाचार सर्व जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी उत्तमरीत्या ते पार पाडत आहेत . काळानुरूप त्यांचे स्वरूप बरेच बदलते आहे .आणि ते बदलण्याची गरजही आहेच . आता आधुनिक तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव आहे . अगदी सुरुवातीला हस्तलिखित होती , त्यानंतर पांढऱ्या ,भुरकत कागदाव काळ्या रंगाच्या प्रिंटिंगच्या शाईने छपाई व्हायची .आता रंगीबेरंगी शाईने सुंदर चित्रे ,जाहिराती यांनी तो खूपच आकर्षक झाला आहे . पाहूनच वाचायचा मोह आवरत नाही . काहींचे संपादकीय लेख ,अग्रलेख वाचनीय असतात तर काहींना शेअर मार्केटबिझनेस,फिटनेस आहार , राजकारण , अर्थकारण अशा विविध गोष्टींमध्ये जास्त रस असतो . त्यादृष्टीने आता तशीही काही वर्तमानपत्र काढली जातात . विशेष वर्तमानपत्राना खास मानाचा पुरस्कारही दिला जातो . वृत्तपत्र म्हणजे लोकशाहीचा आरसाच असतो. अर्थात लोकशाहीमुळे जनप्रवाहच्या वेगवेगळ्या मतांमुळे अनेक पक्ष स्थापन झाले आहेत ,होत आहेत . त्या प्रत्येक पक्षाचे विचार वेगवेगळे असतात . ते समाजात पोहोचवण्यासाठी प्रत्येक पक्ष आपापले स्वतंत्र असे न्युजपेपर्स काढत आहेत . काही तर इतक्या जहालपणे आपली मते , विचार , टीकास्त्र चालवतात की कधी कधी हा आपल्या पूर्वजांनी इतक्या झगडून आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले ते व्यर्थच होते का असा प्रश्न पडतो . समाजासाठी जे खरोखरच हितकारक आहेत असे विचार मांडणे अपेक्षित आहे . यातून कोणत्याही एका पक्षाचा स्वार्थी विचार , डोकावता कामा नये . त्यासाठी चांगले विचार ,चांगली मते लोकांपर्यंत पोहोचवीत याची काळजी घेणे आवश्यक आहे . कितीही अडचणी आल्या तरी वर्तमानपत्रांचे लोकांच्या मनातील स्थान इतके पक्के आहे की अजूनही सार्वजनिक वाचनालये , स्टॉल्स वर यांचे स्थान तितकेच मजबूत टिकून आहे . भले वाचायला जास्त वेळ नसतो ,पण घरात ताजा पेपर घेणारच आणि किमान ठळक बातम्या तरी डोळ्यांखालून घातल्याशिवाय दिवसाची प्रसन्न सकाळ झाल्यासारखेच वाटत नाही . आजच्या ई पेपरच्या काळात लोकांकडे खरोखर लोकांकडे काही वेळा मनात असूनही वाचायला वेळच नसतो . आणि म्हणुनच आता यांचे स्वरूप आणखीनच बदलत आहे . दररोजचे जीवन इतके व्यस्त आणि फास्ट झाले आहे की त्यांना पेपर वाचायला सवडच नसते .कधी कधी तरी पेपरची घडी सुद्धा मोडली जात नाही , तसाच पेपर बाजुला पडतो . नवीन आणि मॉडर्न तंत्रज्ञानामुळे दूरदर्शन , यूट्यूब , गूगल अशा विविध माध्यमातुन लगेंच कोणतीही माहिती सहज मिळते . कागदासाठी पर्यवरणाचे नुकसान होते . शिवाय पेपर ,प्रिंटिंगसाठी लागणारी शाई, पेपर यांचा खर्च , प्रेस चालवण्यासाठी लागणारे कष्ट , कर्मचाऱ्यांचा खर्च , धावपळ , हे टाळावे आणि झटपट कुठेही आपल्याला आवश्यक असलेली बातमी सहज उपलब्ध व्हावी म्हणुन ई पेपर ही संकल्पना आता जास्त पुढे येत आहे. याचाही आपण तितक्याच आनंदाने स्वीकार करायला हवा. पण त्याच बरोबर या वृत्तपत्रांच्या जोरावरच आपल्याला आज इतके सुंदर ,गुलामगिरीतून मुक्त असे सोन्याचे दिवस लाभले आहेत याची जाणीव सुद्धा मनात प्रत्येकाने ठेवलीच पाहिजे. आपण सहज गरज नसतानाही कित्तीतरी शॉपिंग करतो ,किंवा एकदा हॉटेल मध्ये गेलो तरी हजाराच्या आकड्यात बिल येते. पूर्वी प्रत्येक घरात किमान एक तरी वर्तमानपत्र असायचेच, कित्येकजण तरी 4..5 सुद्धा घ्यायचे. पण जी वृत्तपत्रे समाजासाठी खरोखरच मोलाचे कार्य करत आहेत, ती चालु ठेवण्यासाठी प्रसंगी पदरमोड करून , मेहनतीने, चिकाटीने धडपडत आहेत, त्यांचे दर सुद्धा अगदी क्षुल्लक आहेत. अशा साठी एक समाजकार्य समजून त्यांना खरंच जमेल तशी मदत करावी. मग ही मदत अगदी आर्थिक शक्य नसेल तरी छोट्या मोठ्या जाहिराती मिळवून देणे , किंवा अगदीच काही शक्य नसेल तर किमान दररोज वर्तमानपत्र विकत घेऊन तरी खारीची मदत करणे सहज शक्य आहे .

– सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.


मातीची पणती आणि संस्कृतीचे संवर्धन

दिवाळी म्हणजे प्रकाशाचा उत्सव, पण हा प्रकाश प्रत्येकाच्या आयुष्यात पसरतो का, हा गंभीर विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आज बाजारपेठांमध्ये कृत्रिम रोषणाई आणि बनावट वस्तूंची चलती आहे, ज्याच्या झगमगाटात आपल्या मातीशी आणि संस्कृतीशी जोडलेले पारंपरिक कारागीर मागे पडत चालले आहेत. कुंभार समाजातील बांधव जे दिवसरात्र राबून मातीची पणती घडवतात, त्यांच्या श्रमाचे योग्य मूल्य मिळेल का, हा प्रश्न दरवर्षी दिवाळीच्या तोंडावर ऐरणीवर येतो.

आधुनिकतेच्या रेट्यात आपण सोयीचा मार्ग पत्करत असताना, आपल्या परंपरेचा कणा असलेल्या या हातांना आधार देणे आपले सामाजिक कर्तव्य ठरते. विजेच्या लखलखाटात मातीच्या पणतीचा मंद प्रकाश कुठेतरी झाकोळून जात आहे. परंतु, या पणतीमध्ये जी आपुलकी, श्रम आणि मातीचा अस्सल सुगंध असतो, तो कोणत्याही कृत्रिम साधनात सापडत नाही. जेव्हा आपण स्थानिक कारागिरांकडून वस्तू खरेदी करतो, तेव्हा आपण केवळ एक वस्तू विकत घेत नसतो, तर एका पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या कलेला आणि अर्थव्यवस्थेला बळ देत असतो. दिवाळीच्या या पर्वात आनंदाची उजळाई केवळ आपल्यापुरती मर्यादित न राहता, समाजातील उपेक्षित घटकांपर्यंत पोहोचायला हवी. यंदाच्या दिवाळीत परदेशी उत्पादनांना फाटा देऊन आपल्याच मातीतील हातांच्या कष्टाला न्याय देऊया. घरादारात मातीचा दिवा तेवत ठेवून खऱ्या अर्थाने संस्कृतीचा प्रकाश घराघरांमध्ये पोहोचवूया.







आली दिवाळी, पण समृद्धी हरवली!

दिवाळी म्हणजे आनंदाची उधळण, अंगणातील रांगोळी, दारात आकाशकंदील, शेतकऱ्यांच्या घरात अन्नधान्यांच्या राशी, शेतमजूर, श्रमिकांचा समाधान सोहळा, फराळाचा दरवळ आणि मुलांच्या चेहऱ्यावरील निरागस हास्य, सासरवाशिन लेकीचा आनंद, बहिणीची भाऊबीज, अंधारावर प्रकाशाचा आणि निराशेवर आशेचा विजय साजरा करणारा हा सण प्रत्येकाच्या मनात समृद्धीची स्वप्ने जागवतो.मात्र, यंदा अत्यल्प पावसामुळे निर्माण झालेल्या दुष्काळसदृश परिस्थितीने या आनंदावर चिंतेचे सावट पसरले आहे.

एका बाजूला बाजारपेठा रोषणाईने उजळत असताना दुसऱ्या बाजूला ग्रामीण भागातील अनेक कुटुंबे पाणी,चारा, रोजगार आणि वाढत्या महागाईशी झुंज देत आहेत.आज दिवाळी उंबरठ्यात आली; पण अनेकांच्या मनातील काळजीचा अंधार अद्याप दूर झालेला नाही. शेतात करपणारी पिके,मनात साचलेली चिंता शेतकऱ्याचे आयुष्य आभाळाच्या भरवशावर चालते. पेरणीच्या वेळी तो बियाण्यांसोबत आशाही मातीत रुजवतो.कर्ज काढून खते, औषधे आणि मशागतीचा खर्च करतो.पीक चांगले आले की कर्ज फेडायचे, मुलांच्या शिक्षणासाठी पैसे बाजूला ठेवायचे, घराची डागडुजी करायची आणि दिवाळीला कुटुंबासाठी नवीन कपडे घ्यायचे,अशी त्याची साधी स्वप्ने असतात. परंतु पावसाने ओढ दिली की या स्वप्नांचे गणित कोलमडते. पाण्याअभावी पिकांची वाढ खुंटते,उत्पादन घटण्याची भीती निर्माण होते आणि शेतकऱ्याच्या नजरेसमोर कर्जाचा डोंगर उभा राहतो. शेताच्या बांधावर उभे राहून करपणाऱ्या पिकांकडे पाहताना त्याच्या मनात एकच प्रश्न घोळत असतो.इतका खर्च करूनही पदरात काय पडणार? ज्या शेतकऱ्याच्या कष्टावर समाजाची अन्नाची गरज भागते,त्यालाच सणाच्या दिवसांत घरखर्चाची चिंता सतावावी,हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे विदारक वास्तव आहे. शेतमजुरांच्या घरातील अपुऱ्या राहिलेल्या इच्छा शेतातील कामे कमी झाली की त्याचा थेट परिणाम रोजंदारीवर जगणाऱ्या शेतमजुरांवर होतो.काम मिळाले तर चूल पेटते;काम नसेल तर घरखर्चाचा प्रश्न उभा राहतो. अशा परिस्थितीत दिवाळीसाठी मुलांनी नवीन कपड्यांचा हट्ट धरला,तर आई-वडिलांची अवस्था कठीण होते.मुलांच्या डोळ्यांत सणाची स्वप्ने असतात; मात्र पालकांच्या मनात किराणा, औषधे आणि रोजच्या गरजांची चिंता असते. दुसऱ्या गावात कामाच्या शोधात जाणे,दिवसभर राबूनही रोजगाराची खात्री नसणे आणि मिळालेल्या मजुरीत संसाराचा गाडा ओढणे,हा अनेक कुटुंबांचा रोजचा संघर्ष आहे.दुष्काळाचीखरी झळ शेतकऱ्याच्या उत्पन्नाला बसते, तर शेतमजुराच्या हातातील काम हिरावून घेते. पक्ष्यांचा थव्याप्रमाणे रोजगाराच्या भटकंतीसाठी स्थलांतर वाढते. देशाची अन्नसुरक्षा धोक्यात येते. पोषण आहाराचा प्रश्न अधिक गंभिर होतो परिणामी कुपोषणाची तीव्रता वाढते.अशा अनेक संकट श्रृखंलेकडे केवळ शेतीचा प्रश्न म्हणून पाहून चालणार नाही. चारा-पाणी टंचाईने पशुधनांच्या आस्तित्वाचा प्रश्न उभा ठाकला आहे.म्हणून यंदा वसुबारसेला केवळ पूजन करून चालणार नाही.त्यांच्या संरक्षणाचा वीडा उचलायला हवा. ग्रामीण भागात जनावरे ही कुटुंबाची संपत्ती आणि उत्पन्नाचा आधार असतात. मात्र,पावसाच्या कमतरतेमुळे हिरवा चारा उपलब्ध न झाल्यास पशुपालकांचा खर्च वाढतो. विकतचा चारा घेणे परवडत नाही आणि पाण्याची उपलब्धताही कमी झाली,तर जनावरांचे संगोपन कठीण बनते.दूध उत्पादन घटल्यास उत्पन्नावरही परिणाम होतो. नाइलाजाने जनावरे विकण्याची वेळ येणे,हे पशुपालकासाठी आर्थिक नुकसान तर असतेच;पण त्याच्या जिव्हाळ्याच्या नात्यालाही तडा देणारे असते. दुसरीकडे, पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची प्रतीक्षा,हंडाभर पाण्यासाठी मैलानमैल होणारी पायपीट, हंडे भरण्यासाठी होणारी धावपळ आणि उपलब्ध पाणी जपून वापरण्याची कसरत ग्रामीण जीवनातील ताण वाढवते.पाणी ही मूलभूत गरज असताना त्यासाठी संघर्ष करावा लागणे,हे गंभीर वास्तव आहे.तद्वतच विकासाच्या परिभाषेवर चिंतन करायला भाग पाडणारे ठरते. महागाईने दिवाळीचा आनंदही महागला सणासुदीच्या बाजारपेठेत मिठाई,कपडे आणि सजावटीच्या वस्तूंची रेलचेल असते.परंतु वाढत्या किमतींमुळे सामान्य कुटुंबांना खरेदी करताना अनेकदा हात आखडता घ्यावा लागतो. खाद्यतेल,साखर, तूप,डाळी आणि सुकामेवा यांच्या खर्चात फराळाचे बजेट वाढते; त्यात कपडे आणि इतर गरजांची भर पडते. शेतमालाचे उत्पन्न अनिश्चित असताना वाढत्या खर्चाचा भार `लणे शेतकरी आणि शेतमजुरांसाठी अधिकच कठीण होते.मुलांच्या कपड्यांची खरेदी पुढे ढकलावी लागते,फराळाचे पदार्थ कमी करावे लागतात किंवा सणाचा खर्च मर्यादित ठेवावा लागतो. बाजारपेठेतील झगमगाट आणि ग्रामीण घरांतील आर्थिक कोंडी यांतील अंतर अशा वेळी प्रकर्षाने जाणवते. उपाययोजनांसोबत सामाजिक बांधिलकीही हवी. या संकटातून दिलासा देण्यासाठी शासनाने पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई आणि पीकविम्याची मदत वेळेत उपलब्ध करून द्यावी.रोजगार हमीच्या कामांना गती देणे, पिण्याच्या पाण्याचे नियोजन करणे आणि गरजेनुसार चारा डेपो व चारा छावण्यांची व्यवस्था करणे आवश्यक आहे. दीर्घकालीन उपाय म्हणून जलसंधारण, भूजल पुनर्भरण, शेततळी आणि कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यात लोकसभाग ची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. स्थानिक शेतकरी, कारागीर आणि महिला बचतगटांकडून वस्तू खरेदी केल्यास ग्रामीण अर्थव्यवस्थेला हातभार लागतो. गरजू कुटुंबांना मदत करणे, संकटग्रस्तांच्या पाठीशी उभे राहणे आणि सणाचा आनंद त्यांच्यासोबत वाटून घेणे,हीच माणुसकीची खरी दिवाळी ठरू शकते. खरंतर दिवाळीच्या पणत्या अंधार दूर करण्याचा संदेश देतात;परंतु दुष्काळाने होरपळलेल्या कुटुंबांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी केवळ रोषणाई पुरेशी नाही. शेतकऱ्याला आर्थिक आधार, शेतमजुराला रोजगार, जनावरांना चारा आणि प्रत्येक कुटुंबाला पुरेसे पाणी मिळणे आवश्यक आहे. या गरजा पूर्ण झाल्या,तरच समृद्धीचा संदेश समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल. यंदा एखादा शेतकरी दिवाळीची पणती लावताना पुढील हंगामाची चिंता मनात बाळगून असतांना,त्याच्या वेदनेची जाणीव समाजाने ठेवली पाहिजे.कारण शेतकऱ्याच्या शेतात समृद्धी फुलल्याशिवाय आणि शेतमजुराच्या घरात चूल आनंदाने पेटल्याशिवाय दिवाळीच्या उत्सवाला पूर्णत्व येणार नाही. आपण आपल्या घरासोबतच दुसऱ्याच्या आयुष्यातही आनंदाचा दिवा लावूया. संकटग्रस्तांच्या पाठीशी उभे राहून मदतीचा हात देऊया. दिवाळीचा खरा प्रकाश पणत्यांच्या ज्योतीत नसून, दुःखात असलेल्या माणसाच्या जीवनात आशा निर्माण करण्यात आहे. दुष्काळाच्या सावटात माणुसकीचा दिवा तेवत ठेवणे, हाच समृद्धीचा संदेश घेऊन येणाऱ्या दिवाळीचा खरा अर्थ आहे.



- शशिकांत म.तोटे
दारव्हा,जि.यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

आनंदाची रोषणाई की धोक्याची घंटा?

आनंद, उत्साह आणि मांगल्याचा सण असलेली दिवाळी हा भारतीय संस्कृतीचा प्राण आहे. पण काळ बदलला तशी या सणाच्या स्वागताची पद्धतही बदलली. आज दिवाळी म्हणजे प्रचंड प्रमाणावर फटाक्यांची आतषबाजी आणि त्यामुळे होणारे प्रदूषण. आनंद व्यक्त करण्याचा हा मार्ग आपल्याच पर्यावरणासाठी आणि आरोग्यासाठी एक गंभीर धोका बनत चालला आहे.



दिवाळीच्या काळात वाजवले जाणारे अती तीव्र आवाजाचे फटाके ध्वनी प्रदूषणाची पातळी उच्चांकावर नेतात, ज्यामुळे वृद्ध, लहान मुले आणि हृदयरोग्यांच्या जिवावर बेतू शकते. दुसरीकडे, धूर आणि रसायनांमुळे हवेची गुणवत्ता इतकी खालावते की श्वास घेणेही कठीण होते. विषारी वायू आणि धुळीचे कण हवेत दीर्घकाळ स्थिरावल्यामुळे श्वसनाचे आजार आणि दमा यांसारख्या व्याधी झपाट्याने वाढतात. परंपरा आणि संस्कृतीच्या नावाखाली आपण निसर्गाचा हा हास थांबवणे काळाची गरज आहे. अंधार दूर करण्यासाठी फटाक्यांच्या धुराची नव्हे, तर दिव्यांच्या तेजाची गरज असते. यंदाच्या दिवाळीत फटाक्यांपासून दूर राहून, पर्यावरणपूरक आणि आत्मिक आनंद देणारी रोषणाई साजरी करूया. निसर्गाचे रक्षण करणे हीच खरी संस्कृती आहे, हे या सणाला विसरून चालणार नाही.















राज्यसेवा मुख्य परीक्षा वर्णनात्मकच हवी!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) राज्यसेवा मुख्य परीक्षेच्या स्वरूपाबाबत पुन्हा सुरू झालेल्या चर्चेमुळे विद्यार्थी आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. यूपीएससीच्या धर्तीवर स्वीकारलेली वर्णनात्मक परीक्षा पद्धती कायम ठेवावी. वारंवार परीक्षा पद्धतीत बदल करून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळू नये, अशी ठाम भूमिका विद्यार्थी व पालकांकडून मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर पालक व सेवानिवृत्त शिक्षक दे. वा वैद्य यांनी राज्यसेवा परीक्षा वर्णात्मकच असावी अशी आग्रही मागणी केली आहे .




महाराष्ट्र शासनाने २०२२ मध्ये राज्यसेवा मुख्य परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने घेण्याचा निर्णय जाहीर केला. चंद्रकांत दळवी समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर घेतलेला हा निर्णय प्रशासकीय सेवेच्या गुणवत्तावाढीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला गेला. त्यानंतर २०२५ पासून वर्णनात्मक पद्धतीने मुख्य परीक्षेला सुरुवात झाली. या निर्णयानुसार हजारो विद्यार्थ्यांनी गेल्या दोन वर्षांपासून आपली अभ्यासपद्धती बदलली. उत्तरलेखनाचा सराव, विश्लेषणात्मक अभ्यास, विषयांचे आकलन आणि मुद्देसूद मांडणी यासाठी त्यांनी प्रचंड मेहनत घेतली. अशा परिस्थितीत पुन्हा वस्तुनिष्ठ बहुपर्यायी परीक्षा पद्धतीकडे वळण्याची चर्चा विद्यार्थ्यांच्या चिंतेत भर घालणारी ठरत आहे. केवळ पाठांतर नव्हे, तर विचारक्षमता तपासणारी परीक्षा हवी! राज्यसेवा परीक्षा ही केवळ शासकीय पदे भरण्याची प्रक्रिया नाही, तर महाराष्ट्राच्या भविष्यातील प्रशासनाची दिशा ठरविणारी यंत्रणा आहे. महसूल, ग्रामीण विकास, सामाजिक न्याय, सार्वजनिक आरोग्य आणि विविध शासकीय योजनांची अंमलबजावणी करताना अधिकाऱ्यांना अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. अशा वेळी केवळ पुस्तकी ज्ञान किंवा तथ्यांची माहिती पुरेशी ठरत नाही. परिस्थितीचे विश्लेषण, तर्कशुद्ध विचार, निर्णयक्षमता, अभिव्यक्ती आणि समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता आवश्यक असते. वर्णनात्मक परीक्षेमुळे उमेदवाराची विचारप्रक्रिया, लेखनकौशल्य, विषयाचे आकलन, चिकित्सक दृष्टिकोन आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्याची क्षमता तपासता येते. प्रशासनात काम करताना धोरणांचे विश्लेषण, कायदेशीर तरतुदींचे आकलन आणि जनहिताचे निर्णय घेण्याची क्षमता महत्त्वाची असते. त्यामुळे भावी अधिकाऱ्यांची निवड करताना वर्णनात्मक परीक्षा अधिक परिणामकारक ठरू शकते, असे मत अनेक अभ्यासक व प्रशासकीय क्षेत्रातील जाणकार व्यक्त करतात. विद्यार्थ्यांच्या दोन वर्षांच्या मेहनतीचे काय? परीक्षा पद्धतीतील बदल हा केवळ अभ्यासक्रमातील बदल नसतो, तर विद्यार्थ्यांच्या संपूर्ण तयारीवर त्याचा परिणाम होतो. वर्णनात्मक पद्धतीनुसार दोन वर्षे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा बहुपर्यायी पद्धतीसाठी तयारी करावी लागल्यास त्यांच्या वेळेचे, श्रमाचे आणि मानसिक ऊर्जेचे नुकसान होऊ शकते. आधीच अनिश्चितता, मर्यादित संधी आणि वाढती स्पर्धा यामुळे विद्यार्थी तणावाखाली असताना परीक्षा पद्धतीतील वारंवार बदल त्यांचे मनोबल खच्ची करणारे ठरू शकतात. वस्तुनिष्ठ परीक्षेचेही स्वतःचे महत्त्व आणि मर्यादा आहेत. मात्र मुख्य परीक्षेचा उद्देश उमेदवाराची केवळ माहिती तपासणे नसून प्रशासनासाठी आवश्यक असलेल्या व्यापक क्षमतांचे मूल्यमापन करणे हा असला पाहिजे. त्यामुळे वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब केल्यानंतर तिचे मूल्यमापन करून आवश्यक सुधारणा कराव्यात; मात्र विद्यार्थ्यांना विश्वासात न घेता पुन्हा संपूर्ण परीक्षा स्वरूप बदलण्याचा निर्णय घेऊ नये. आंदोलनातील मागण्या आणि परीक्षा पद्धतीचा प्रश्न वेगळा ठेवावा! पुण्यात अलीकडे झालेल्या विद्यार्थी आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आयोगाच्या कामकाजातील पारदर्शकता, पेपरफुटी आणि प्रशासनाविषयीच्या प्रश्नांवर चर्चा झाली. मात्र आयोगाच्या कार्यपद्धतीतील त्रुटी दूर करणे आणि मुख्य परीक्षेचे स्वरूप बदलणे हे दोन स्वतंत्र विषय आहेत. आयोगातील अनियमितता दूर करण्याच्या मागणीच्या आडून परीक्षा पद्धतीच बदलण्याचा निर्णय घेतला जाऊ नये. विद्यार्थ्यांच्या व्यापक हिताचा विचार करूनच कोणताही निर्णय घेतला पाहिजे. महाराष्ट्राला केवळ परीक्षार्थी नव्हे, तर सक्षम प्रशासक हवेत! महाराष्ट्राला निर्णयक्षम, कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि जनहिताला प्राधान्य देणारे अधिकारी हवे असतील, तर निवड प्रक्रियेतही त्याच गुणांचे परीक्षण झाले पाहिजे. यूपीएससीच्या धर्तीवरील वर्णनात्मक परीक्षा पद्धती ही त्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे शासन आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने विद्यार्थ्यांच्या भविष्याचा, त्यांच्या दोन वर्षांच्या परिश्रमांचा आणि प्रशासकीय गुणवत्तेचा गांभीर्याने विचार करावा. परीक्षा पद्धतीतील स्थैर्य ही विद्यार्थ्यांची अपेक्षा आहे. नियम बदलण्यापेक्षा व्यवस्था सक्षम करा, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास टिकवा आणि राज्यसेवा मुख्य परीक्षा वर्णनात्मकच ठेवा, हीच विद्यार्थी व पालकांची शासनाकडे आग्रही मागणी आहे.

– **मनीष काळे,**
राळेगाव

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) : मानवी जीवनाला कलाटणी देणारी आधुनिक क्रांती

एकविसाव्या शतकाने मानवी इतिहासात अनेक तांत्रिक बदल पाहिले आहेत. अग्नीचा शोध, चाकाचा शोध, औद्योगिक क्रांती आणि त्यानंतर आलेली इंटरनेटची लाट या टप्प्यांनी मानवाचे जीवन आमूलाग्र बदलून टाकले. आज आपण अशाच एका ऐतिहासिक वळणावर उभे आहोत, ज्याचे नाव आहे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (Artificial Intelligence - AI) अर्थात 'कृत्रिम बुद्धिमत्ता'. पूर्वी केवळ सायन्स फिक्शन चित्रपटांमध्ये दिसणारे रोबोट्स आणि बोलणारे संगणक आता वास्तवात उतरले असून, ते आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनले आहेत.



कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे नेमके काय? सोप्या भाषेत सांगायचे तर, कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे संगणक किंवा यंत्रांना माणसाप्रमाणे विचार करण्याची, शिकण्याची, समस्या सोडवण्याची आणि निर्णय घेण्याची दिलेली क्षमता होय. मानवी मेंदू ज्याप्रमाणे अनुभवातून शिकतो आणि परिस्थितीनुसार निर्णय घेतो, अगदी तसेच कार्य एआयमधील अल्गोरिदम, 'मशीन लर्निंग' (Machine Learning) आणि 'डीप लर्निंग' (Deep Learning) यांच्या साहाय्याने केले जाते. या यंत्रांना अवाढव्य माहितीचा (Data) पुरवठा केला जातो. या माहितीचे विश्लेषण करून ही यंत्रे स्वतःहून पॅटर्न ओळखतात आणि अचूक निष्कर्ष काढतात. गेल्या काही वर्षांत 'जनरेटिव्ह एआय'ने (Generative AI) तर जगभरात धुमाकूळ घातला आहे. चॅटजीपीटी, जेमिनी यांसारख्या माध्यमातून लेख लिहिणे, कविता रचणे, कोडिंग करणे, चित्र काढणे आणि व्हिडिओ तयार करणे काही सेकंदांत शक्य झाले आहे. दैनंदिन जीवनातील एआयचा वावर अनेकांना वाटते की एआय हे केवळ मोठ्या प्रयोगशाळांमध्ये किंवा आयटी कंपन्यांमध्येच वापरले जाते. मात्र, आपण सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत कळत-नकळत एआयचा वापर करत असतो. आपल्या स्मार्टफोनचा फेस अनलॉक, गुगल मॅप्सवर ट्रॅफिकचा अंदाज घेऊन सुचवला जाणारा जवळचा रस्ता, युट्यूब किंवा नेटफ्लिक्सवर आपल्या आवडीनुसार समोर येणारे व्हिडिओ, ई-कॉमर्स वेबसाईटवर दिसणाऱ्या वस्तूंच्या शिफारसी आणि गुगल असिस्टंट किंवा अलेक्सा यांसारखे व्हॉइस कमांडचे पर्याय हे सर्व कृत्रिम बुद्धिमत्तेचेच चमत्कार आहेत. आपल्या मोबाईलमधील स्पॅम ई-मेल्स गाळण्याचे कामही एआय शांतपणे करत असते. विविध क्षेत्रांतील क्रांतिकारी बदल समोर आले आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेने आज जगातील जवळपास प्रत्येक क्षेत्रात आपले पाय पसरले आहेत: १. वैद्यकीय आणि आरोग्य क्षेत्र : आरोग्य क्षेत्रात एआय अक्षरशः वरदान ठरत आहे. कॅन्सरसारख्या गंभीर आजारांचे प्राथमिक टप्प्यात अचूक निदान करण्यासाठी, एक्स-रे आणि एमआरआय रिपोर्ट्सचे सूक्ष्म विश्लेषण करण्यासाठी एआयचा वापर केला जात आहे. रोबोटिक सर्जरीमुळे अत्यंत गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया अचूक आणि सुरक्षितपणे पार पडत आहेत. तसेच नवीन औषधांचा शोध लावण्यासाठी लागणारा अनेक वर्षांचा कालावधी एआयमुळे काही महिन्यांवर आला आहे. २. शेती आणि ग्रामीण विकास : भारतासारख्या कृषिप्रधान देशात एआय शेतीचे चित्र बदलू शकते. हवामानाचा अचूक अंदाज वर्तवणे, जमिनीतील ओलावा आणि पोषक घटकांचे प्रमाण तपासणे, ड्रोनच्या मदतीने पिकांवरील रोगांचे निदान करून केवळ गरजेच्या ठिकाणीच औषध फवारणी करणे या बाबी एआयमुळे सुलभ झाल्या आहेत. यामुळे शेतकऱ्यांचा उत्पादन खर्च कमी होऊन उत्पन्न वाढण्यास मदत होत आहे. ३. शिक्षण क्षेत्र : शिक्षणात एआयमुळे 'पर्सनलाईज्ड लर्निंग'ची संकल्पना पुढे आली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याचीकलन क्षमता वेगळी असते. एआय आधारित शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांच्या कमकुवत बाजू ओळखून त्यांना त्यांच्या गतीने शिकण्यास मदत करतात. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही जागतिक दर्जाचे ज्ञान स्वतःच्या मातृभाषेत मिळवणे भाषांतर करणाऱ्या एआय टूल्समुळे शक्य झाले आहे. ४. बँकिंग आणि उद्योग : बँकिंग क्षेत्रात होणारे आर्थिक गैरव्यवहार आणि सायबर फसवणूक रोखण्यासाठी एआय प्रणाली सेकंदाच्या आत संशयास्पद व्यवहारांचा शोध घेते. शेअर बाजारातील गुंतवणुकीचे विश्लेषण, ग्राहकांच्या शंकांचे निरसन करणारे चॅटबॉट्स आणि कारखान्यांमध्ये २४ तास न थकता अचूक उत्पादन करणारे स्वयंचलित यंत्रमानव यामुळे औद्योगिक उत्पादकता कित्येक पटींनी वाढली आहे. ५. माध्यम आणि पत्रकारिता : वृत्तपत्र आणि डिजिटल मीडियामध्ये बातम्यांचे संकलन, मुद्रितशोधन (प्रूफरीडिंग), भाषांतर, आकर्षक ग्राफिक्स डिझाइन आणि वाचकांच्या आवडीनुसार कंटेंट तयार करण्यासाठी एआय एक सक्षम मदतनीस म्हणून समोर आले आहे.









बदलती जीवनशैली आणि आपले कर्तव्य



‘आरोग्यम् धनसंपदा’ हे सुभाषित आपण लहानपणापासून ऐकत आलो आहोत. माणसाकडे कितीही अमाप पैसा, गाडी, बंगला आणि प्रतिष्ठा असली, तरी जर त्याचे शरीर निरोगी नसेल, तर या सर्व भौतिक सुखांचा उपभोग घेता येत नाही. आजच्या प्रचंड धावपळीच्या आणि स्पर्धेच्या युगात माणूस पैशांच्या मागे धावताना स्वतःच्या आरोग्याकडे मात्र दुर्लक्ष करत आहे. त्यामुळेच आज उत्तम आरोग्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित करण्याची गरज निर्माण झाली आहे.

आरोग्य म्हणजे केवळ रोगांचा अभाव नव्हे, तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे सुदृढ असण्याची अवस्था होय. पूर्वीच्या काळी मानवी जीवन कष्टाचे होते. शेतीची कामे, चालणे आणि शारीरिक हालचालींमुळे नैसर्गिकरीत्या व्यायाम होत असे. मात्र, आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात बैठ्या कामाचे प्रमाण वाढले आहे. तासनतास संगणकासमोर बसणे, मोबाईलचा अतिवापर आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे लठ्ठपणा, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदयविकार यांसारख्या आजारांनी तरुण पिढीलाही विळखा घातला आहे. उत्तम आरोग्यासाठी ‘संतुलित आहार’ हा सर्वात महत्त्वाचा पाया आहे. आपण जे खातो, त्यातूनच आपले शरीर घडत असते. आजकाल फास्ट फूड, जंक फूड आणि अति तेलकट-तिखट पदार्थांचे सेवन वाढले आहे. हे पदार्थ जिभेला चव देतात, पण शरीराला आतून पोखरतात. याउलट, आपल्या दैनंदिन आहारात हिरव्या पालेभाज्या, ताजी फळे, कडधान्ये, दूध आणि पुरेशा पाण्याचा समावेश असणे अत्यंत आवश्यक आहे. वेळेवर आणि प्रमाणात केलेले भोजन अनेक आजारांना दूर ठेवते. आहारासोबतच ‘नियमित व्यायाम’ आणि ‘पुरेशी झोप’ हे आरोग्याचे दोन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. दररोज किमान ३० ते ४५ मिनिटे चालणे, धावणे, पोहणे किंवा योगासने केल्याने शरीरातील रक्ताभिसरण सुधारते आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढते. तसेच, शरीराला आणि मेंदूला विश्रांती मिळण्यासाठी दररोज ७ ते ८ तासांची शांत झोप घेणे गरजेचे आहे. अपुऱ्या झोपेमुळे चिडचिडेपणा, अपचन आणि मानसिक थकवा जाणवतो. शारीरिक आरोग्याइतकेच ‘मानसिक आरोग्य’ देखील महत्त्वाचे आहे. आजच्या काळात कामाचा ताण, कौटुंबिक जबाबदाऱ्या आणि भविष्याची चिंता यामुळे अनेकजण नैराश्य (डिप्रेशन) आणि तणावाचे बळी ठरत आहेत. मन प्रसन्न नसेल, तर त्याचा थेट परिणाम शरीरावर होतो. त्यामुळे मानसिक शांततेसाठी ध्यानधारणा (मेडिटेशन), प्राणायाम करणे, आपल्या आवडीचे छंद जोपासणे आणि कुटुंबासोबत, मित्रांसोबत मनमोकळा संवाद साधणे अत्यंत गरजेचे आहे. याशिवाय, व्यसनांपासून दूर राहणे ही निरोगी आयुष्याची पहिली अट आहे. तंबाखू, गुटखा, धूम्रपान आणि मद्यपान यांसारखी व्यसने माणसाला अकाली मृत्यूच्या दाढेत ओढतात. तसेच, वैयक्तिक स्वच्छता आणि परिसराची स्वच्छता राखल्यास अनेक संसर्गजन्य आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो. थोडक्यात सांगायचे तर, आपले शरीर हे एक मंदिर आहे आणि त्याची काळजी घेणे हे आपले प्रथम कर्तव्य आहे. आजार झाल्यावर डॉक्टरांकडे धाव घेण्यापेक्षा आणि औषधांवर लाखो रुपये खर्च करण्यापेक्षा, आजार होऊच नये म्हणून प्रतिबंधात्मक काळजी घेणे केव्हाही श्रेयस्कर ठरते. चला तर मग, आजपासूनच आपल्या जीवनशैलीत सकारात्मक बदल करूया आणि निरोगी, आनंदी व दीर्घायुष्याचा संकल्प करूया!

बदलती जीवनशैली आणि धोक्याची घंटा!

आधुनिक सुखसोयींमुळे मानवी कष्ट कमी झाले असले, तरी बैठ्या जीवनशैलीने (Sedentary Lifestyle) गंभीर आजारांना निमंत्रण दिले आहे. तासनतास एकाच जागी बसून काम करणे, रात्री उशिरापर्यंत मोबाईल किंवा टीव्ही पाहणे आणि अनियमित जेवणाच्या वेळा यामुळे तिशीतील तरुणांमध्येही हृदयविकार, मधुमेह, उच्च रक्तदाब आणि मणक्यांचे आजार झपाट्याने वाढत आहेत. थकवा जाणवणे, अचानक वजन वाढणे, धाप लागणे किंवा सतत चिडचिड होणे यांसारख्या प्राथमिक लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका. वयाच्या तिशीनंतर वर्षातून किमान एकदा संपूर्ण शारीरिक तपासणी (Body Check-up) करून घेणे आवश्यक आहे. लक्षात ठेवा, वेळेवर केलेले निदान आणि जीवनशैलीतील सुधारणा भविष्यातील मोठे आरोग्यसंकट टाळू शकतात.



विजयकुमार गाडगे
सूरजनगर, यतवमाळ

माझ्या मरणानंतर

मायभूमी
मी जन्मल्यानंतर कित्यक शतके
गुलामगिरीचे आसूड फटकारीत घालविले
आयुष्य
तुझ्यातल्या कोणत्याच हिरव्या अंगानी
पांग फेडावं असं कोणतं झाड नाही
इथल्या काळ्या मातीनेही त्याचं गुण गावं
असं एखादं गाव नाही,
ज्या भाकरीच्या तुकड्यालाही आम्ही पोरकं होऊन
वणवण वस्त्या धुंडाळाव्यात
पायदळीतल्या धुळीसारखी अस्ख्वी हयात
अन् कोणत्या सत्कर्माने दान देऊन ढेकर द्यावी
असं कोणतंच नाव नाही
आमच्या रक्तातून धगधगतोय वणवा
क्षुब्ध ज्वालामुखीसारखा
प्रसंगी आमची मणगटं तलवार अन्
बोटं संगिनी व्हाव्यात अशी
पण,
किती स्वस्तात खपली जातात या मातीत
काही आयुष्ये
अनेकदा वाटतं खूप
पेटवावी इथली बेबंदशाही
यावेळी कोणाचेच बोट माझ्यावर नाही
काय गुन्हा करावा... कितीसा करावा
काही कळत नाही मलाच माझे
कोण्या दिशेला नजर द्यावी...
साऱ्याच कक्षा बंदिस्त आहे
दरेक वस्तीतली झोपडी झोपडी हंबरते आहे
सांग मायभूमी ?
माझ्या मरणानंतर करावेत सोहळे साजरे
असा मी काय करावा
काय गुन्हा करावा... माझ्या मरणानंतर.















बाबा.....!

ते हिवाळ्याचे दिवस होते जानेवारीचा महिना सुरू होता.हवेत गारवा होता. म्हातारे शशांक सकाळचे आठ वाजल्यापासून बस थांब्यावर बसून थंडीत कुडकुडत होते. थांब्यावर बस येताना येणारी-जाणारी माणसं बसकडे निरखून बघत होते . आता दुपारचे बारा वाजले होते. म्हातारा घामाघूम,अस्वस्थही झाला होता. सकाळपासून त्याच्या पोटात अन्नाचा कण नव्हता की पाण्याचा थेंब."पाणी, खायला तरी द्या, लवकर! माझा जीव गुदमरु लागलाय". म्हाताऱ्याची दशा बघून थांब्यावर उभे असलेले घाबरले होते. तरुणी धावतच रेस्टारंटमध्ये गेली. खारे, गोड पदार्थ आणि पाण्याची बॉटलही आणलीय. म्हाताऱ्याने एका दमात खारे, गोड पदार्थ खाल्ल्ये. गटागटा पाणीही प्याला.



आता काही क्षणानंतर म्हातारा शुद्धीवर आला. बाकड्यावर बसून केविलवाणे नजरेने तरुणीकडे बघून म्हणाला, "बेटी, लंडनला जाणारे विमान गेले की जायचे आहे?. माझा मुलगा अकराच्या विमानाने लंडनला जाणार आहे. त्याने मला याच बस थांब्यावर थांबायला सांगितलेय." तरूणी कळवळून म्हणाली, "बाबा, विमान तर केव्हाचेच निघून गेलेय." "काय? नाही, नाही! असे होऊच शकत नाही"! वेडावाकडा चेहरा आणि हातवारे करीत म्हातारा चिडून रागाने म्हणाला.परत तरुणीने विमानाची शहानिशा केली. विमान अकरा वाजताच लंडनला रवानाही झाले होते. "बाबा तुम्हाला तुमच्या मुलाने याच बस थांब्यावर यायला सांगितले होते की....!" "नाही हो! याच थांब्यावर त्याने मला थांबायला सांगितले होते,तेही एकदा नव्हे,तर तीनदा! तरीही तो निघून गेलाय"? "बाबा चला! मी तुम्हाला तुमच्या घरी पोहोचून देते" "घर,? म्हाताराच्या करूणआक्रोशाने थांब्यावर उभेअसलेले सगळे भांबावले होते. "तो माझ्याशीअसा का वागला?" केविलवाणे डोळ्यातील आसू पुशीत म्हातारा म्हणाला. "बाबा, एक विचारू, तुम्ही चिडणार तर नाही ना?" "बेटा, तुझा राग! तू होतीस म्हणून, नाहीतर...!" म्हातारा स्वतःला सावरून पुढे म्हणाला, "तो मला सांगून लंडनला गेला असता,तर मी त्याला हसत हसत निरोप दिला असता!" म्हाताराचा त्रागा बघून तरुणीच्या डोळ्याच्या कडाही ओल्या झाल्या होत्या.

आता दुपारचे दोन वाजून गेले होते.म्हातारा शोकविव्हळ होवून म्हणाला, "बेटी,तुझे उपकार....! म्हाताऱ्याला पुढे बोलू न देता त्याचे हात धरून तरुणी भावविव्हळ होवून म्हणाली "तुम्ही माझ्या बाबा सारखे आहात!" तेवढ्यात एक कार बस थांब्यासमोर थांबलीय. कार मधून उतरलेल्या तरूणाकडे बघून अंगाचा तिळपापड झाल्यागत चिडून रागाने म्हातारा म्हणाला, "गोविंद,...!" बाबा,तुम्ही कारमध्ये बसा.सगळंच सांगतोय!" . "बाबांना कुठे घेऊन जात आहात"? तरुणी म्हणाली." काळजी करू नका आनंद वृद्धाश्रमात"!! गोविंद. "बेटी माझी काळजी करू नकोस, हा माझा चिरंजीव नसला तरी तो माझी सर्वतोपरी काळजी घेईन" "बाबा तुम्हाला घेण्यासाठी शाम बस थांब्यावर येतच होता, वाटेत त्याला कागदपत्राची आठवण झाली. कागदंपत्रें हॉटेलवरच राहिली होती, विमानाची वेळ झाल्यामुळे तो येऊ शकला नाही. पण काल रात्रीच त्याने तुमची राहण्याची उत्तम व्यवस्था आनंद वृद्धाश्रमात केली आहे. तसे त्यानेचिठ्ठीमध्ये सविस्तर लिहिले आहे. चिट्ठी वाचा म्हणजे कळेल तुम्हाला!" "आदरणीय तीर्थरूप बाबा, मी तुम्हाला घ्यायला बस थांब्याकडेच येत होतो.परंतु विमानाची सर्व कागदपत्रे हॉटेलवरच राहिल्यामुळे परत हॉटेलवर गेलो. शोधा शोध केली. विमानतळावर पोहोचलो, तेव्हा वीसच मिनिटं बाकी होती. बाबा माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका! आई गेली तेव्हापासून मी तुमचे हाल बघतोय. गोविंद आणि आनंद वृद्धाश्रमाचे व्यवस्थापक तुमच्याशी बोलतीलच. बाबा, तुम्हाला वृद्धाश्रमात फक्त एक वर्षच रहायचे आहे. मोबाईल वरून मी तुमच्याशी सतत बोलेल. बाबा, या अक्षम्य चुकीबद्दल मला क्षमा करा!" "स्वतःच्या करियरचा विचार सोडून माझ्याकरीता चिट्ठी लिहितानाकिती यातना झाल्या असतील माझ्या शामला? विचारात कारमध्ये बसल्या बसल्याच म्हाताराच्या डोळ्यातून अश्रू गळत होतो.

– प्रा.कमलाकर देविदास हणवंते
मो.नं.९४२३६५४२८६























बदलती जीवनशैली आणि संस्कृती

ऑक्टोबरच्या उकाड्याने कासावीस झालेल्या जीवाला जेव्हा नोव्हेंबरच्या सुरुवातीला पहाटेच्या वेळी गार वाऱ्याची झुळूक स्पर्श करते, तेव्हा समजून जावे की महाराष्ट्रात 'गुलाबी थंडी'चे आगमन झाले आहे. नोव्हेंबर ते फेब्रुवारी या चार महिन्यांच्या काळात संपूर्ण महाराष्ट्र एका वेगळ्याच उत्साहात, चैतन्यात आणि निसर्गसौंदर्यात न्हाऊन निघतो. पांढऱ्या धुक्याची दुलई पांघरलेले रस्ते, गवताच्या पात्यांवर मोत्यांसारखे चमकणारे दवबिंदू आणि सकाळच्या कोवळ्या उन्हाची ऊब, हे महाराष्ट्रातील हिवाळ्याचे खास वैशिष्ट्य आहे.

भौगोलिक विविधता आणि थंडीचे रूप महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेनुसार इथल्या हिवाळ्याचे रूपही प्रदेशानुसार बदलत जाते. विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रात थंडीचा कडाका सर्वाधिक जाणवतो. नागपूर, यवतमाळ, अकोला, अमरावती, गोंदिया या विदर्भातील जिल्ह्यांसोबतच निफाड, नाशिक आणि जळगावमध्ये पारा अनेकदा १० अंशांच्या खाली घसरतो. या भागांत रात्री आणि पहाटे अक्षरशः हुडहुडी भरवणारी थंडी असते. याउलट, कोकण पट्ट्यात आणि मुंबईत हिवाळा अतिशय सौम्य आणि आल्हाददायक असतो. तर पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यात दिवसा उबदार ऊन आणि रात्री सुखद गारवा असे संमिश्र वातावरण अनुभवायला मिळते. रब्बी हंगामाची लगबग आणि ग्रामीण जीवन महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात हिवाळा म्हणजे बळीराजासाठी समृद्धीचा काळ असतो. खरीप हंगामाची कापणी उरकून शेतकरी रब्बीच्या पेरणीत गुंग होतो. हिवाळ्यात पडणारे दव आणि थंड हवामान गहू, हरभरा, ज्वारी आणि करडई या पिकांसाठी अत्यंत पोषक ठरते. शेतामध्ये डोलणारी हिरवीगार पिके आणि पिवळ्याधमक मोहरी किंवा सूर्यफुलांचे ताटवे ग्रामीण भागाचे सौंदर्य द्विगुणित करतात. गावागावांमध्ये पहाटे आणि संध्याकाळी पारावर, चौकात किंवा घरासमोर पेटणाऱ्या 'शेकोट्या' हे ग्रामीण संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे. या शेकोटीभोवती बसून रंगणाऱ्या गप्पांच्या मैफिली, राजकारणापासून ते शेतीपर्यंतच्या चर्चा थंडीची मजा काही औरच वाढवतात. खवय्येगिरी आणि 'हुर्डा पार्टी'ची धूम हिवाळा हा आरोग्यासाठी सर्वात उत्तम ऋतू मानला जातो. या काळात पचनशक्ती सुधारत असल्याने महाराष्ट्राच्या



खाद्यसंस्कृतीत मोठी रेलचेल पाहायला मिळते. हुरडा पार्टी : मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रात डिसेंबर-जानेवारी महिन्यात 'हुरडा पार्टी'चे (कवळ्या ज्वारीचे भाजलेले दाणे) आयोजन केले जाते. शेतात बसून गरमागरम हुरडा, त्यासोबत शेंगदाणा-लसणाची चटणी, दही, गूळ आणि रेवडी खाण्याची परंपरा आज शहरी लोकांनाही भुरळ घालत आहे. पौष्टिक पदार्थ : थंडीपासून शरीराचे रक्षण करण्यासाठी घराघरांत डिंकाचे लाडू, मेथीचे लाडू, तीळ-गुळाचे लाडू आणि सुक्या मेव्याचे पदार्थ बनवले जातात. गावरान बेत : ज्वारी किंवा बाजरीची गरमागरम भाकरी, त्यावर लोण्याचा गोळा, वांग्याचे भरीत, ठेचा आणि कांद्याची पात हा गावरान बेत या दिवसांत अमृतासमान लागतो. तसेच ताज्या हिरव्या भाज्या, गाजर, मटार, हरभऱ्याचे टहाळ (ओला हरभरा) आणि तुरीच्या शेंगा बाजारात मुबलक प्रमाणात उपलब्ध असतात. पर्यटनाचा बहर आणि किल्ल्यांची भटकंती हिवाळा हा महाराष्ट्रातील पर्यटनासाठी सुवर्णकाळ मानला जातो. कडक उन्हाचा त्रास नसल्याने पर्यटक मोठ्या संख्येने घराबाहेर पडतात. महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, चिखलदरा, तोरणमाळ आणि इगतपुरी या थंड हवेच्या ठिकाणांवर पर्यटकांची अलोट गर्दी उसळते. महाबळेश्वरमधील स्ट्रॉबेरीचा हंगाम याच काळात बहरतो. याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सह्याद्रीच्या रांगांमधील रायगड, प्रतापगड, राजगड, सिंहगड, हरिश्चंद्रगड यांसारख्या गड-किल्ल्यांवर ट्रेकिंगसाठी तरुणांची पावले वळतात. विदर्भातील ताडोबा-अंधारी, पेंच आणि मेळघाट या व्याघ्रप्रकल्पांमध्ये जंगल सफारीचा आनंद घेण्यासाठी देश-विदेशातील पर्यटक याच दिवसांत पसंती देतात. तसेच, हिवाळ्यात महाराष्ट्रातील विविध धरणांवर आणि पाणथळ जागी हजारो मैल प्रवास करून येणारे फ्लेमिंगो (रोहित पक्षी) आणि इतर स्थलांतरित पक्षी पक्षीनिरीक्षकांसाठी मोठी पर्वणी ठरतात. सण-उत्सवांची उबदार साथ हिवाळ्याची सुरुवातच मुळी दिवाळीच्या दीपोत्सवाने होते. त्यानंतर येणारी तुळशीची लग्ने, ग्रामदैवतांच्या यात्रा-जत्रा आणि जानेवारीत येणारा 'मकर संक्रांत' हा सण हिवाळ्यातील असीम उत्साहाचे प्रतीक आहे.



राजलक्ष्मी
मल्टीस्टेट क्रेडीट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि.यवतमाळ
Reg. No. MSCS/CR/544

अधिक माहीती साठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क करा.
83084 55555
मुख्यालय : राजलक्ष्मी हाईट्स, संकट मोचन रोड, यवतमाळ - ४४५००१

